# प्रकरण दुसरे

## 'मराठी ग्रामीण कादंबरी व गावठाण'

# प्रकरण दुसरे

## 'मराठी ग्रामीण कादंबरी व गावठाण'

प्रस्तावना

कादंबरी म्हणजे काय?

मराठी ग्रामीण कादंबरी

पहिली ग्रामीण कादंबरी

मराठी ग्रामीण कादंबरी विश्वाचा प्रवास

ग्रामीण आणि प्रादेशिक संकल्पना

प्रादेशिक कादंबरी

ग्रामीण कादंबरी

ग्रामीण कादंबरीतील ग्रामीणता

ग्रामीण कादंबरीचा रूपबंध

ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये

मराठी ग्रामीण कादंबरीची निर्मिती ते इ.स.१९५०

१९५१ ते १९७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचा प्रवास

१९७१ ते आजपर्यंतच्या ग्रामीण कादंबरीचा प्रवास

ग्रामीणतेचा अस्सल आविष्कार 'गावठाण'

'गावठाण' मधील प्रातिनिधिक ग्रामीण स्त्री

निष्कर्ष

सारांश

संदर्भसूची

# प्रकरण दुसरे

# 'मराठी ग्रामीण कादंबरी व गावठाण'

**प्रस्तावना :**

महात्मा फुले यांची मुख्य प्रेरणा घेऊन आकारास आलेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा मराठी वाड्.मयातील एक महत्त्वाचा वाड्.मयीन प्रवाह आहे. हा प्रवाह १९७० नंतर बहरल्याचे आपणास दिसून येते. १९७० नंतरच्या काळात उच्चशिक्षित ग्रामीण तरूण दलित साहित्यिकांप्रमाणे आपणही आपल्या व्यथा, वेदना, भावना साहित्यातून आणू शकतो या भावनेने प्रेरित झाला व तो आपल्या विचारांना शब्दात बांधू लागला. मनाच्या उत्स्फूर्ततेतून आणि प्रतिभाशक्तीने प्रेरित होऊन आजपर्यंत भोगलेलं, पाहिलेलं, अनुभवलेलं ग्रामीण जीवन तो वास्तवाच्या पातळीवर येऊन मांडू लागला. आपल्या लेखणीने तो ग्रामीण वास्तवाला भिडू लागला. आणि ग्रामीण भागातील लोकांना जगावं लागणारं जीवन, त्यांची सुख दु:खे, हालअपेष्ठा, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, व्यथा-वेदना, आक्रोश, त्यांची निसर्गाधिनता, शेती आणि शेतीभोवती फिरणारं त्यांच जीवन यांना शब्दबद्ध करू लागला. यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेऊ लागले.

ग्रामीण साहित्याच्या प्रतिथयश लेखकांमध्ये नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं.बोराडे, आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, ना.धों. महानोर, आनंद पाटील, विश्वास पाटील, उद्धव शेळके, श्री.म. माटे, शंकर पाटील, ग.ल. ठोकळ इत्यादी साहित्यिकांची नावे घेता येतील. या सर्व प्रतिभासंपन्न लेखकांनी आपलं संपूर्ण ग्रामीण विश्व शब्दबद्ध करायला सुरवात केली. त्यासाठी त्यांनी साहित्याचे विविध प्रकार हाताळले. त्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, निबंधलेखन यामधून त्यांनी आपलं ग्रामीण जीवन साकारल्याचे दिसून येते. या लेखकांना कथा, कविता व निबंधलेखनाचा प्रांत आपले अनुभव कथन करण्यासाठी मर्यादित वाटू लागला. त्यातूनच ग्रामीण कादंबरी साकारली गेली. तिने संपूर्ण मराठी ग्रामीण साहित्यात आपला वेगळा ठसा उमटवला. अशा मराठी

ग्रामीण कादंबरीच्या सर्वांगाचा व वाटचालीचा आणि तिला समांतर असणाऱ्या कृष्णात खोतांच्या 'गावठाण' कादंबरीचा उहापोह सदर प्रकरणात प्रस्तुत प्रबंधलेखक करणार आहे.

**कादंबरी म्हणजे काय?**

साहित्य प्रकाराच्या संकल्पनेमध्ये साहित्याचे प्रकार असण्याविषयी विविध मतमतांतरे असल्याचे आढळते. यातूनच साहित्यप्रकारांचे काही सकारात्मक व नकारात्मक विवेचन केल्याचे आपणास आढळून येते. यामध्ये वाङ्.मय व साहित्यात यांच्या व्याख्या देणे, वर्गीकरण करणे हा कलानुभावाचा स्वाभाविक घटक असणे, साहित्यप्रकाराची आवश्यकता अभ्यासाच्या सोयीसाठी सांगणे व प्रत्येक साहित्याला आपला एक घाट असतो. अशा अनेक प्रकारे समीक्षकांनी आपले विचार व्यक्त केल्याचे आपणास दिसून येते. यामध्ये प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी मांडलेल्या पायाभूत साहित्यिक करारामध्ये कथनात्मक, नाट्यात्मक व भावात्मक हे मूलभूत करार मांडल्याचे आपणास दिसून येते. यामध्ये असणाऱ्या कथात्मक म्हणजेच सांगण्याच्या करारामध्ये 'कादंबरीचा' समावेश होतो.

अशा या कादंबरीची व्याख्या करताना, ''वाङ्.मयीन क्षेत्रामध्ये एका विशिष्ट स्वरूपाच्या वाङ्.मय प्रकाराचा निर्देश करण्यासाठी कादंबरी ही संज्ञा मराठी समीक्षेत रुढ झालेली आहे.''[१] या कादंबरीचे स्वरूप हे कथात्म गद्याचे दीर्घरूप असे असते. कादंबरीचा पैस व्यापक स्वरूपाचा असतो. कादंबरी लेखनाचे हेतू हे १) रंजनवाद व २) वास्तववाद अशा पद्धतीने असल्याचे आपणास दिसून येते.

कादंबरीमध्ये कार्यकारणभाव साधलेला असतो. तिची मांडणी व्यक्तिकेंद्रित, समाजकेंद्रित तसेच घटनाकेंद्रित अशा स्वरूपाची असते. कादंबरीचे प्रयोजन सहेतुक अशा स्वरूपाचे असते. त्याचबरोबर हेतुपूर्ण अशी कादंबरीची रचना केलेली असते. कादंबरी मांडत असताना त्यामध्ये वास्तवतेबरोबरच वाचकाच्या अभिरूचीचा विचार केला जातो.

त्याचवेळी लेखकाचा दृष्टीकोन हाही तितकाच महत्त्वाचा घटक असतो. तसेच कादंबरीला सामाजिकतेबरोबर वाङ्.मयीन परंपराही लाभलेली असते.

स्थल, काल व परिस्थिती यामधून साहित्यिकाची साहित्यकृती जन्म घेत असते. या सर्व गोष्टींचा अंर्तभाव कादंबरीमधून साकार झाल्याचे दिसून येते. कादंबरी हा स्वयंभू प्रकार नाही. त्यामध्ये अनेक द्रव्यांचे सामीलीकरण केल्याचे आढळते. अनुभवातून त्याचबरोबर लेखकाच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणातून कादंबरी साकारली जाते. कादंबरीमध्ये कथात्मकतेबरोबरच, काव्यात्मता, नाट्यात्मता व गुढगुंजनही येऊन कादंबरी आकार घेते.

वातावरण हा कादंबरीचा महत्त्वाचा असा घटक आहे. वातावरणातूनच व्यक्तिविशेष प्रत्ययास येत असतात. याचबरोबर सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कादंबरीचे निवदेन व भाषाशैली. निवेदन हे भाषेवरच अवलंबून असते. निवेदनावर व भाषाशैलीवर कादंबरीचे यशापयश अवलंबून असते. भोवतालच्या परिस्थितीनुसार लेखकाची भाषा तयार होते व भाषेतील जिवंतपणामुळेच कादंबरी वाचकाला भावते. अशा या विविध घटकातून कादंबरी साकारली जाते. अशा विविध वाङ्.मयीन वैशिष्ट्यांचा अंतर्भाव असणारी कादंबरी ग्रामीण साहित्यामध्ये कशा पद्धतीने वाटचाल करते आहे याची चर्चा करू.

## मराठी ग्रामीण कादंबरी :

''ग्रामीण साहित्य हा पाश्चात्य संस्कृतिच्या अभ्यासाने प्रेरित झालेल्या आधुनिक मराठी साहित्याचा एक भाग आहे.''[२] असे आनंद यादवांनी म्हटले आहे. तेव्हा एकूणच आधुनिक वाङ्.मयाच्या प्रेरणा ह्या देशी आणि प्राचीन वाङ्.मयाशी नाळ जोडणाऱ्या नव्हत्या हे दिसून येते. या आधुनिक वाङ्.मयामध्ये महात्मा फुलेंची प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्य नावारूपाला आले. या ग्रामीण साहित्याचा आविष्कार कथा, कादंबरी, कविता, निबंधलेखन समीक्षा यामधून होऊ लागला. कथात्म साहित्याचे दीर्घरूप घेऊन प्रकट होणाऱ्या ग्रामीण कादंबरीनेही आपल्या परिघात ग्रामीण वास्तवाला, ग्रामीण जीवनाला, ग्रामीण संवेदनेला

न्याय दिल्याचे दिसून येते. खरेतर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काही ग्रामीण कादंबऱ्यांची रचना झाली असली तरी त्याचे स्वरूप हे केवळ अनुकरणातून व पांढरपेशी जीवनातून निर्माण झालेल्या कादंबरीतील तोचतोचपणा पाहून नव्या जीवनाचे चित्रण करण्याची हौस म्हणून निर्माण झाली होती. त्या कादंबऱ्यांमध्ये वास्तवाचा अभाव असल्याचे आपल्याला आढळून येते. १९५० नंतर मात्र ग्रामीण कादंबरी ही वास्तवाभिमुख आणि देशीय जाणीवेतून निर्माण होताना दिसते.

ग्रामीण कादंबरी म्हणजे काय सांगताना आनंद यादव लिहितात, ''भारतीय (पर्यायाने मराठी) खेड्याचा आत्मा असलेली शेतीप्रधान जीवनपद्धती किंवा संस्कृती जिच्यातून आविष्कृत होते. तीच ग्रामीण कथा किंवा कादंबरी वाटते. तिच्यातील सर्वच घटक तेथील शेतीनिष्ठ संस्कृतीशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंधित असावेत अशी आपली कळत नकळत अपेक्षा असते. ग्रामीण कथा म्हणजे ग्रामीण बहुजनांची कथा अशी ती असावी. शेतीनिष्ठ संस्कृतीच्या परिणामातून निर्माण झालेले दारिद्रय, अज्ञान, निसर्गप्रेम, मातीचे प्रेम, जातीव्यवस्था, अलुतेदारी, पारंपरिक निष्ठा, समजुती इत्यादी विशेष तिच्यातून आविष्कृत व्हावेत अशी आपली कळत नकळत अपेक्षा आजवरच्या मराठी साहित्यिकांनी करून ठेवली आहे.''[3] यादव यांचे हे मत ग्रामीण कादंबरीचा आणि एकूणच ग्रामीण साहित्याचा नेमकेपणा दर्शविते. भारतीय खेड्याचा आत्मा शेती आणि तिच्याशी निगडीत जीवनपद्धती हा आहे. तेथील गावगाड्याची रचना हीच शेतीला केंद्रीत धरून झालेली असते.

ग्रामीण कादंबरीत असणारे महत्त्वाचे घटक म्हणजे शेती, शेतकरी, त्यांचे दारिद्रयमय जीवन हे होय. ग्रामीण कादंबरीचा विचार करताना महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) या ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण कादंबरी वाटावी इतक्या ग्रामीण जीवनाच्या वास्तवातून फुल्यांनी हा ग्रंथ निर्मिला आहे. म्हणूनच तर रवींद्र ठाकुर यांच्यासारख्या साहित्यिकांना तो ग्रंथ एखाद्या ग्रामीण कादंबरीसारखा वाटतो.

ग्रामीण कादंबरी ही खऱ्या अर्थाने मराठी कादंबरीला प्राप्त झालेले वैभव आहे. १९५० नंतरच्या ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनाचा

15926

अस्सल आविष्कार करून ग्रामीण कादंबरी जिवंत व रसरशीत केली. त्यांनी पाहिलेले आणि भोगलेले वास्तव ग्रामीण जीवन आपल्या कादंबऱ्यांमध्ये मांडले. अशा पद्धतीने अभिरूची, अभिव्यक्ती, निर्मिती ह्या अंगाने ग्रामीण कादंबरीमध्ये झालेले परिवर्तन हे ग्रामीण साहित्याचे आणि ग्रामीण कादंबरीचेही आत्मबल वाढविणारे आहे.

आनंद यादव,नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं.बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, ना.धों. महानोर, आनंद पाटील, उद्धव शेळके, श्री.ना. पेंडसे, शंकर पाटील यांसारख्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांमधून समकालीन ग्रामीण वास्तवाचा उत्कट आविष्कार होताना आपल्याला दिसून येतो. याबद्दल ग्रामीण कादंबरी असा शब्दप्रयोग न करता स्थान प्रधान कादंबरी असा उल्लेख करून भालंचद्र नेमाडे म्हणतात, ''स्थानप्रधान कादंबरीने आपल्या मर्यादित क्षेत्रात वास्तवाचे जबरदस्त प्रांत उभारून मराठीतल्या पुण्या-मुंबईच्या एकांतिक रीतप्रधान परंपरेला खुजे वाटायला लावले, दोन पिढ्या रूजलेल्या अवास्तव लैंगिक आशयाचे पितळ उघडकीला आणले, गंभीर परिणाम दिले, जोरकस गावठी मराठी भाषा कादंबरीत घुसवून निवेदनाची अल्पशब्दकळा दिली, नवी आशयनिष्ठ तंत्ररूप रूढ केली. मराठी कादंबरीच्या विकासात ह्या प्रवृत्तीला महत्त्वाचे स्थान दिले. त्याने मराठी वास्तववादाचा रक्तक्षय संपविणारे देशी भान दिले.''[४] नेमाडेंचे हे विचार अगदी यथार्थ वाटतात. कारण १९७५ नंतर ग्रामीण कादंबरीकारांची, नवशिक्षितांची नवी पिढी उदयाला आली आणि ग्रामीण कादंबरीचे दालन अधिक समृद्ध झाले. दलित, आदिवासी, बहुजन अशा विविध स्तरातून आलेले कादंबरीकार ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म वास्तव कठोर पद्धतीने साकार करू लागले.

## पहिली ग्रामीण कादंबरी :

मराठी साहित्य विश्वात पाश्चात्यांकडून आलेला साहित्याचा प्रकार म्हणजे कादंबरी, मराठी वाड्.मयात सुरवातीची कादंबरी ही भाषांतरीत स्वरूपाचीच अशी होती. यमुनापर्यटन (१८५७) ही बाबा पद्मनजी यांची कादंबरी मराठी कादंबरी विश्वातील पहिली

कादंबरी होय. त्यानंतर विविध विषयांवर भाषांतरीत तसेच स्वतंत्र स्वरूपाच्या कादंबऱ्या निर्माण झाल्या असे असले तरी ग्रामीण साहित्यात बाबा पद्मनजीच्या कादंबरीनंतर जवळजवळ तीन दशकांनी कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी निर्माण झाली आणि मराठी ग्रामीण कादंबरीचा उदय झाला. ग्रामीण साहित्यात आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा समावेश या कादंबरीमध्ये असूनही केवळ तंत्रदृष्ट्या योग्य नाही या कारणामुळे मराठी ग्रामीण साहित्याचे प्रतिभासंपन्न लेखक तसेच थोर समीक्षक आनंद यादव या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून नाकारतात. त्यांच्या दृष्टीने 'पिराजी पाटील' (१९०३) ही टीकेकर उर्फ धनुर्धारी यांची कादंबरी ही पहिली ग्रामीण कादंबरी होय. या दोन्ही कादंबऱ्यांचे कथानक हे 'दुष्काळ' या विषयाशी संबंधित आहे. तसे पाहिल्यास दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या जीवनाचे चित्रण करणारी 'बळीबा पाटील' ही कादंबरी कालमानाप्रमाणे पहिली कादंबरी ठरते. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये पहिली कोणती हा समीक्षात्मक दृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा असला तरी या कादंबऱ्यांमधून ग्रामीण कादंबरीची सुरवात झाली हे मात्र निश्चित. दुष्काळाशी संबंधीत असलेल्या या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण भागाला, तेथील शेतकऱ्याला त्याच्या सुखदु:खाना हालअपेक्षांना योग्य प्रकारे न्याय दिला आहे. यामधूनच ग्रामीण मराठी कादंबरी नंतरच्या काळात निर्माण झाली व बहरल्याचे आपणास दिसून येते.

### मराठी ग्रामीण कादंबरी विश्वाचा प्रवास :

'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' ह्या दोन कादंबऱ्यांच्या निर्मितीनंतर मराठी ग्रामीण कादंबरीची निर्मिती झाल्याचे आपल्याला दिसून येत नाही. पुढे बराच काळ ग्रामीण कादंबरी लिहली गेली नसली तरी ग्रामीण साहित्यिक हे ग्रामजीवनाच्या व्यथा, वेदना यांना आपल्या साहित्यामधून साकारत होते. यानंतरच्या पिढीतील लेखकांनी ग्रामीण साहित्य व ग्रामीण जीवन यांच्यातील नातेसंबंधाचा उलगडा साहित्याद्वारे करवून दिला. ग्रामीण जीवन व त्यातील जाणिवांच्या अतूट नात्याला आपल्या कादंबरी वाड्.मयाच्या सहाय्याने वाट

मोकळी करून दिली. ग्रामजीवन खऱ्या अर्थाने विस्तारीत रूपात वाङ्.मयात आकार घेऊ लागले. कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील इत्यादी लेखकांनी ग्रामीण मनाची व्यथा, वेदना आपल्या साहित्याद्वारे व्यक्त करण्यास प्रारंभ केला. त्याचेच अनुकरण त्यानंतरच्या इतर साहित्यिकांनी केले. विशेषत: १९२५ पासून मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली व ग्रामजीवनाचा आविष्कार असणाऱ्या या साहित्याच्या चळवळीला चांगल्या प्रकारचा पाठींबाही मिळाला.

खऱ्या अर्थाने १९२५ च्या दरम्यान ग्रामीण लेखनाला प्रारंभ व्हायला भारतवर्षामध्ये काही महत्त्वाच्या घडामोडी घडत गेल्या. त्याचा प्रभाव साहित्यावर पडत गेला. त्यामध्ये गांधीवादी, मार्क्सवादी, समाजवादी विचारसरणीचा विशेष प्रभाव होता या विचारसरणीतून ग्रामीण साहित्य फुलत गेले व ते मानवी पातळीवर खऱ्या अर्थाने उतरले, ते आपल्या जीवनजाणिवांसह व वास्तवपरिस्थितीसह. त्यामुळे ग्रामीण साहित्यात जिवंतपणा येऊ लागला असे असले तरी ग्रामीण साहित्याचा तसेच पर्यायाने ग्रामीण कादंबरीच्या प्रथम कालखंडावर खऱ्या अर्थाने प्रभाव पडला; तो महात्मा फुल्यांच्या विचारसरणीचा. त्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड', 'तृतीयरत्न', 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी' या साहित्यकृतीतून मांडलेल्या अमूल्य विचारांमुळे ग्रामीण तरूण खडबडून जागा झाला. त्याला स्वत:च्या अस्तित्त्वाची जाणीव झाली. त्याला आत्मभान आले. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची त्याला कल्पना आली. व या व्यवस्थेविरूद्ध त्याने आवाज उठवायला सुरवात केली. खऱ्या अर्थाने म. फुलेंचा 'शेतकऱ्याचा आूसड' हा ग्रंथ तर रवींद्र ठाकूरांसारख्या समीक्षकांना कादबंरीच वाटतो. तर आनंद यादवांसारख्या थोर समीक्षकांना ग्रामीण वास्तवाचा पाढा मांडणारा व शेतकऱ्यांच्या हालअपेष्ठांना व्यथित होऊन मांडणारा तो ग्रंथ एखाद्या बखरी सारखा वाटतो. त्यातून आपल्याला म.फुल्यांच्या साहित्याची व त्यातून प्रकटलेल्या विचारांची महानता समजते. खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याच्या प्ररेणेची मुख्यधारा ही म.फुल्यांची विचारसरणी हीच आहे.

याचबरोबर स्वातंत्र्ययुगाचे प्रवर्तक ठरलेल्या महात्मा गांधींनी १९२०च्या दरम्यान 'खेड्याकडे चला' ही ऐतिहासिक हाक दिली. त्याचबरोबर 'भारताचा आत्मा खेडयात आहे' या त्यांच्या उपदेशामुळे ग्रामीण साहित्याच्या निर्मितीवर लेखकांनी अधिक भर देण्यास सुरवात केली. त्यांच्या विचारसरणीने या कालखंडातील लेखकांना अंर्तमुख केले. या सर्व बाबींमुळे प्रेरित होऊन साहित्याची निर्मिती तर होऊ लागलीच. परंतु या कादंबऱ्यांमधून येणारे ग्रामीण वास्तव हे वरवरचे जाणवू लागले. त्यात आत्मियतेचा अभाव वाटू लागला. त्यामध्ये असणाऱ्या लेखकांमध्ये प्र.ह. खाडिलकर, भा.वि. वरेरकर, रा.शा.पाटील, ग.रा.वाळिंबे, वि.वा. हडप यांचा समावेश होतो. अस्सल ग्रामीणत्त्व हे त्यांच्या लेखनामधून प्रत्ययास येत नाही हे मात्र निश्चित.

१९२० नंतरचा काळ हा मात्र अनेक बाबतीत महत्त्वाचा असाच आहे. या काळात महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या विविध घडामोडी होऊ लागल्या व या नंतरच्या काळात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्या ह्या ग्रामीण वास्तवाला स्पर्श करू लागल्या. त्यामध्ये र.वा.दिघे यांची 'पानकळा' (१९३९), 'सराई' (१९४३), बा.सी.मर्ढेकरांची 'तांबडी माती' (१९४३), ग.ल.ठोकळांची 'गावगुंड' (१९४५) त्याचबरोबर श्री. ना. पेंडसे, बा.भ.बोरकर यांच्या कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनातील वास्तवता व रौद्रभीषणता यांना चित्रबद्ध केले व ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने आकार घेऊ लागली. सुरवातीच्या कृत्रिम चित्रणांपासून या काळात ग्रामीण कादंबरीने वास्तवचित्रणाला भिडायला सुरवात केली. व आपल्या आशयामध्ये ग्रामीण वास्तवाला व जीवनानुभवांना पकडण्यास सुरवात केली.

१९५०-६० नंतरच्या काळात मात्र ग्रामीण कादंबरीने हळुहळू कात टाकली. व ती अधिकाधिक वास्तव पातळीवर उतरू लागली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागामध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचली. त्यामधून ग्रामीण भागातील तरूण शिक्षणाचे धडे गिरवू लागले, शिकू लागले, शिकलेला ग्रामीण तरूण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही असलेल्या आपल्या ग्रामीण भागाची अगतिकिता, भयानक वास्तवता.

आपल्या संवेदनशील मनाने पाहू लागला. त्यांची व महात्मा फुल्यांच्या विचारांची ओळख झाली व म.फुल्यांच्या विचारांच्या प्रेरणेतून स्फूर्ती घेऊन ग्रामीण तरूण आपल्या व्यथा वेदना आपल्या साहित्यातून शब्दबद्ध करू लागला. आणि त्यातूनच ग्रामीण कादंबरी बहरू लागली. या कालखंडामध्ये पेंडसे, गों.नी. दांडेकर, आण्णाभाऊ साठे, विभावरी शिरूरकर, उद्धव शेळके, व्यंकटेश माडगूळकर, रणजित देसाई इत्यादी कादंबरीकारांनी आपली कादंबरी अस्सल व वास्तव जीवनानुभवातून साकारल्याचे दिसून येते.

१९६०-७० च्या दशकात मात्र आनंद यादव, शंकर पाटील, रा.रं.बोराडे, हमीद दलवाई इत्यादी कादंबरीकारांनी आपलं जीवन वास्तव पातळीवर येऊन मांडायला सुरवात केली व खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण कादंबरी वास्तवाला भिडू लागली.

**ग्रामीण आणि प्रादेशिक संकल्पना :**

मराठी ग्रामीण समीक्षेत कधी प्रादेशिक कादंबरी तर कधी ग्रामीण कादंबरी असे शब्दप्रयोग केले जातात. म्हणजेच ग्रामीण आणि प्रादेशिक या संज्ञाच्याबाबत समीक्षकांमध्ये एकमत दिसत नाही. साहित्याच्या संदर्भात ग्रामीण व प्रादेशिक या संज्ञाचा अर्थ निश्चित करण्याचा इथे प्रयत्न केला जातो. ग्रामीण ही संज्ञा ग्रामविशिष्ट अर्थ प्रकट करण्यासाठी तर प्रादेशिक ही संज्ञा भूविशिष्ट अर्थ प्रकट करणारी आहे. ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक या संज्ञेची व्याप्ती अधिक मोठी असून ग्रामीणतेचा समावेश तीमध्ये होऊ शकतो.

'ग्रामीण वाङ्.मय' आणि 'प्रादेशिक वाङ्.मय' यातील भेद नेमक्या शब्दात सांगताना रवींद्र ठाकूर लिहितात, 'प्रादेशिक वाङ्.मय म्हणजे ग्रामविभागाचे समूहजीवन दर्शन आणि ग्रामीण वाङ्.मय म्हणजे ग्रामीविभागातील समूहजीवन टाळून केलेले व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन असा भेद आहे.''[५] ठाकूर यांच्या विवेचनामध्ये नेमकेपणा आहे. कारण समूहजीवन दर्शन हे प्रादेशिकतेचे आणि व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन हे ग्रामीणतेचे विशेष आहेत. ग्रामीण आणि प्रादेशिक या संकल्पना समजून घेताना त्यांचे काही विशेष जाणवतात. त्यामध्ये कृषिसंस्कृती, ग्रामीणबोली, निसर्ग सन्मुखता, कुटूंबव्यवस्था, जातीव्यवस्था हीच

ग्रामीणतेची वैशिष्ट्ये दिसतात. तर प्रादेशिकतेमध्ये विशिष्ठ प्रदेशातील लोकजीवन, तेथील संस्कृती, परंपरा, शेती, समूहजीवन त्या विशिष्ट प्रदेशातील निसर्ग, त्यांच्या समस्या, जीवननाट्य, संपूर्ण प्रदेशच केंद्रस्थानी अशी वैशिष्ट्ये दिसतात. अशी वैशिष्ट्ये असलेल्या कादंबऱ्यांना ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबऱ्या म्हणता येतील. ग्रामीण आणि प्रादेशिक या संज्ञाचा आणि या संज्ञानी ध्वनीत होणाऱ्या साहित्याबद्दल समज-गैरसमज निर्माण झाल्याचे आपणास दिसून येते.

साधारणपणे हे गैरसमज पुढीलप्रमाणे दिसून येतात, कोकणच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या साहित्यकृतींना प्रादेशिक म्हटले जाते तर इतर प्रदेशांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले साहित्य हे ग्रामीण या संकल्पनेत जमा होते. याचबरोबर ग्रामीण आणि प्रादेशिक यात काही फरक नाही असेही अनेकांना वाटते. ग्रामीण आणि प्रादेशिक यांना एकच समजणारी काही प्रातिनिधीक विधाने पुढीलप्रमाणे-

१) ज्यात प्रादेशिकतेची उत्कृष्ट वर्णने आली आहेत ती प्रादेशिक कादंबरी असे म्हटले तरी ही ग्रामीण कादंबरीचीच एक वास्तवपूर्ण आविष्कार आहे.''[६] २) प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचाच अधिक वास्तवपूर्ण आविष्कार होय. असे आपण म्हणतो.[७] अशा पद्धतीची काही विधाने व्यक्त होत असली तरी प्रादेशिक आणि ग्रामीण ह्यामध्ये थोडासा फरक आपल्याला दिसून येतोच. साहित्यातील प्रादेशिकतेचा विचार करताना एक बाब जरूर लक्षात येते ती अशी की, प्रादेशिकतेचे ग्रामीणत्वाशी निश्चित काही बाबतीत साम्य असते. परंतु या दोन्ही संज्ञा एकच आहेत असे मात्र नाही. तसेच या दोन्ही संज्ञानी निर्देशित होणारा अर्थही सारखाच असतो असेही नाही. ते परस्परांना समांतर असतील, परंतु एक नव्हेत. कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही. तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. याबद्दल रा.रं.बोराडे म्हणतात, ''माणसाची कातडी बाजूला काढून जसा आपण त्या माणसाचा विचार करू शकत नाही. तसाच तो विशिष्ट प्रदेश बाजूला ठेवून त्या प्रदेशातल्या व्यक्तिंचा विचार करू शकत नाही.''[८] रा.रं.बोराडेंचे हे मत प्रादेशिकतेच्या बाबतीत अचूक असेच वाटते. कारण

माणसाची आणि त्याच्या प्रदेशाची अतूट अशी नाळ जोडलेली असते. यामुळे त्याच्या अवतीभोवतीच्या प्रदेशाचे चित्रण हे अपरिहार्यपणे त्याच्या साहित्यात येत असते.

"ग्रामीण हे वर्णनात्मक विशेषण असून विशिष्ट प्रकारच्या साहित्याची ओळख व्हावी म्हणून त्याचा वापर केला जातो." असे स.शि. भाव्यांना वाटते."[९] तर आनंद यादवांनाही "ग्रामीण हे वेगळे साहित्य नसून मराठी साहित्याचाच तो एक भाग आहे असे वाटते."[१०] अशाप्रकारचे प्रादेशिकता आणि ग्रामीणता यामध्ये समानत्त्व निश्चित करता येईल आणि त्याच्या मर्यादाही निश्चित करता येतील.

## प्रादेशिक कादंबरी :

प्रादेशिक कादंबरीबद्दल आनंद यादव म्हणतात, "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंस्कृती, संकेत, रीती समूह जीवनातील भावभावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्ये यांचे दर्शन घडविणाऱ्या उद्देशाने ज्या कांदबऱ्या लिहल्या जातात त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या म्हणता येईल."[११] यादवांनी व्यक्त केलेल्या प्रादेशिक कादंबरीच्या विवेचनात. नेमकेपणा असल्याचे आपणास दिसून येते. प्रादेशिक कादंबरीतील लोकजीवन हे वास्तवाच्या पातळीवर असावे अशी अपेक्षा असते. तसे पाहता कोणतीही कादंबरी कोणत्या ना कोणत्या प्रदेशात घडताना आपल्याला दिसून येते.

प्रादेशिक साहित्यात प्रादेशिकतेला प्राधान्य दिलेले असले तरी त्यामध्ये ग्रामीण स्वरूपाच्या लोकजीवनाचा सहभाग असतो. याबद्दल यादव पुढे म्हणतात, "प्रादेशिक हा शब्द वापरताना त्या त्या प्रदेशातील 'ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन' असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही 'ग्रामीण कादंबरीच' मानावी लागते."[१२] यावरून आपल्या हे लक्षात येते की, प्रादेशिक आणि ग्रामीण यामध्ये जरी सूक्ष्म भेद असला तरी ह्या दोन्ही संकल्पना परस्परांना समांतर जाणाऱ्या व एकमेकांमध्ये गुंतलेल्या दिसून येतात.

प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये त्या त्या प्रदेशातील निसर्गवर्णनेही भरपूर येतात. उदा. र.वा.दिघे यांची 'पाणकळा' 'सराई' या कादंबऱ्या तसेच संपूर्ण प्रादेशिकत्व आलेल्या चि.त्र्यं. खानोलकर यांच्या 'रात्र काळी घागर काळी', 'कोंडुरा' गो.नी. दांडेकरांची 'माचीवरचा बुधा' या सर्व कादंबऱ्यांतून भरभरून निसर्ग आल्याचे आपणास दिसून येते. हेच लेखक काही कादंबऱ्यांमधून प्रादेशिकता, दैववाद, दारिद्रय, सोशिकपणा, जुन्या रूढी, रितीरिवाज, औद्योगिक बदल या सर्वांचा परामर्श घेताना दिसून येतात. उदा. खानोलकरांची 'कोंडुरा' उद्धव शेळके यांची 'धग' दांडेकरांची 'पडघवली' 'पवनाकाठचा धोंडी' आनंद यादवांची 'गोतावळा' या सर्व प्रादेशिक कादंबरींची अनुभवकक्षा अशा स्वरूपाची आहे.

प्रादेशिक कादंबरी विषयी चर्चा करताना डॉ. आनंद यादवांनी या कादंबरीचा विकास पाच-सहा टप्प्यांवर झाल्याचे सांगतात ते पुढीलप्रमाणे-

१) हरिभाऊ आपटे यांचे समकालीन धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही कादंबरी यामध्ये प्रादेशिक जीवन वेगळे आहे अशी जाणीव त्याकाळात नव्हती.

२) १९२५ च्या आसपास वाङ्.मयीन सामाजिक, राजकीय परिस्थिती बदलल्यामुळे काही प्रादेशिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. या कादंबऱ्यांनी प्रादेशिक कादंबरीचे अस्तित्त्व शक्य आहे हे दाखवू दिले.

३) १९४०-४५ च्या काळात दिघे-ठोकळ यांनी प्रादेशिक कादंबऱ्या लिहून या साहित्यप्रकाराला प्रतिष्ठा व लोकप्रियता प्राप्त करून दिली.

४) १९४५ नंतर पेंडसे, दांडेकर यांनी प्रादेशिक जीवनावरील लक्षवेधक अशा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यांमुळे विशिष्ट प्रदेशातील विविध वैशिष्ट्ये जिवंतपणे कादंबरीत आली.

५) १९५० नंतर मराठी साहित्याचे नवे युग निर्माण झाले. त्याचा परिणाम प्रादेशिक कादंबरीवरही झाला. प्रादेशिक वास्तवाचे प्रखर आकर्षण असलेल्या कादंबऱ्या या काळात व्यकंटेश माडगूळकर, 'बनगरवाडी', रणजीत देसाई 'माझा गाव', उद्धव शेळके 'धग' ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

६) १९७० च्या आसपास रा. रं.बोराडे यांची 'पाचोळा', आनंद यादव यांची 'गोतावळा' यांसारख्या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील नव्या वर्तमान प्रादेशिक वास्तवाचा शोध आणि वेध घेणाऱ्या, संपूर्ण प्रादेशिक बोलीतून लिहिल्या गेलेल्या प्रादेशिक कादंबऱ्या निर्माण झाल्या.

अशाप्रकारे काळाच्या विविध टप्प्यांवर प्रादेशिक कादंबरी आपला प्रादेशिकतेचा नवा साज घेऊन अवतीर्ण झाली आणि प्रादेशिक कादंबरीने आपले वेगळे अस्तित्त्व सिद्ध केले. प्रादेशिक कादंबरी लेखकांबद्दल बोलताना आनंद यादव पुढे म्हणतात, ''याचकाळात प्रादेशिक पातळीवरच पण काव्यात्मवृत्तीने मानवी मनातील वासना–विकार, आकांक्षा, कौर्य, स्वार्थ, समजुती इत्यादींचा खोलात जावून शोध घेणारा चिं.त्र्यं. खानोलकर हाही एक वेगळाच कादंबरीकार आहे.''[१३] यादवांच्या या विवेचनावरून आपणास असे दिसून येते की, काळानुरूप प्रादेशिक कादंबरीही विशिष्ट प्रदेशातील संवेदनशीलता तिथल्या जीवन जाणीवांसह सुखदु:खासह टिपू लागली व खऱ्या अर्थाने वास्तवरूप घेऊ लागली. असे असले तरी प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरीची सीमा रेषा धूसर असल्यामुळे कोणती कादंबरी ग्रामीण मानावी आणि कोणती कादंबरी प्रादेशिक मानावी असा संभ्रम मराठी समीक्षेत ठळकपणे दिसून येतो.

**ग्रामीण कादंबरी :**

कृषिकेंद्रीत समाजरचना हे ग्रामसंस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. जवळजवळ ७०% लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण विभागात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे शेतकरी हाच समाजरचनेचा केंद्रबिंदू आहे. ग्रामीण समाजजीवनातील इतर घटक त्याच्याभोवती फिरत असतात. बारा बलुतेदार अठरा अलुतेदार आणि शेतकरी यांचा एकमेकांवर आधारित असा संबंध निर्माण झाला. या सर्व ग्रामीण जीवनामधून आकाराला येणारी, ग्रामीण जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणारी आणि ग्रामीण जीवनाशी संबंधित असणारी अशी मराठी ग्रामीण कादंबरी आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीचा विचार करताना प्रथम म. फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) या ग्रंथाचाच उल्लेख करावा लागेल. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला पहिला स्पर्श म.फुलेंनी मराठी साहित्यात केला. म्हणून आनंद यादव त्यांना 'आधुनिक मराठी साहित्याचे जनक' असे म्हणतात. 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ वैचारिक स्वरूपाचा असला तरी त्यात लालित्य आहे. या ग्रंथाविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''तो वाचत असताना आपण एखादी ग्रामीण कादंबरी वाचत आहोत की काय असे वाटू लागते. शेतकऱ्यांची दु:स्थिती वर्णन करताना जोतिबांची लेखनी करूण रसाचा आविष्कार करते. तर त्यांच्यावर अन्याय करणाऱ्यांचा समाचार घेताना ती तीव्र उपरोधाचा अंगिकार करते. ग्रामीण समाज जीवनाचा एक वाङ्.मयीन दस्तऐवज हे कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्ये यामध्ये आहे.''[१४] ठाकुरांचे हे विवेचन अगदी यथार्थ वाटते. ग्रामीण कादंबरीत असणारे महत्त्वाचे घटक म्हणते शेती, शेतकरी, त्यांचे दारिद्रयमय जीवन इत्यादी घटकांचे अतिशय वास्तव असे चित्रण म.फुले यांनी केले आहे. म.फुल्यांचे आदर्श घेऊनच पुढे ग्रामीण कादंबरी साकारली जाऊ लागली.

सुरवातीची ग्रामीण कादंबरी ग्रामीणत्वाला शंभर टक्के न्याय देणारी नसली तरी १९५० नंतर मात्र ग्रामीण कादंबरी वास्तवाभिमुख आणि देशीय जाणिवेतून निर्माण होताना दिसते. एकूण शंभर वर्षाचा इतिहास ग्रामीण कादंबरीला आहे. ह्या शंभर वर्षात मराठी समीक्षेतही ग्रामीण कादंबरीचे नेमकेपण मांडले गेले आहे. ग्रामीण कादंबरीही मराठी कादंबरीला प्राप्त झालेले वैभव आहे. सध्याच्या बदलत्या परिस्थितीत व औद्योगिकीकरणामुळे शहरांचे अतिक्रमण आणि नागरी संस्कृतीचे संक्रमण पचवूनही ग्रामीण संस्कृती आपल्या वैशिष्टांसह जिवंत राहणार आहे. ग्राम आणि ग्रामीणता हा भारतीय समाजरचनेचाच एक अंगभूत घटक असल्यामुळे ग्रामीण कादंबऱ्यांची निर्मिती आणि तिचा आस्वाद हा आता मराठी वाङ्.मयीन संस्कृतिच्या जिवंतपणाचे लक्षण ठरणार आहे हे मात्र निश्चित.

मराठी प्रादेशिक कादंबरी आता संपुष्टात आल्याची तक्रार नागनाथ कोत्तापल्ले यांनी एका चर्चासत्रात मांडली आहे.''[१५] प्रादेशिकांचे वैशिष्ट्य आपल्यात सामावून ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारी ग्रामीण कादंबरी मात्र साठोत्तर मराठी कादंबरीच्या प्रांतात नवे नवे प्रदेश पादाक्रांत करीत असल्याचे दिसते. ग्रामीण कादंबरीच्या संज्ञेत कोकण, कोल्हापूर, सातारा, सांगली, मराठवाडा, खानदेश, विदर्भ अशा सर्व प्रदेशातल्या ग्रामीण जीवनाला साकार करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. तेव्हा प्रादेशिक कादंबरीची जाणीवपूर्वक निर्मिती करणारे अपवादभूत असले तरी ग्रामीण कादंबरीचे भवितव्य मात्र अतिशय उज्वल आहे. प्रादेशिकांचे वैशिष्ट्ये सामावून घेण्याची क्षमताही ग्रामीण कादंबरीच्यात आहे. तेव्हा प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरीचे अव्दैत मान्य करणे हेच वाङ्.मयीन दृष्ट्या कादंबरीकारांच्या, आस्वादकांच्या आणि समीक्षकांच्याही हिताचे आहे. असे नागनाथ कोत्तापल्ले यांना वाटते.

१९०३ मध्ये प्रकाशित झालेल्या धनुर्धारींच्या 'पिराजी पाटील' या कादंबरीपासून खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरीची सुरवात झाली. या कादंबरीपासून ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहाला आजतागायत शंभर वर्षाचा इतिहास असल्याचे दिसते. या कालखंडात पहिल्या साठ वर्षांचा इतिहासमात्र ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रवाहावर तत्कालीन रंजनवादी आणि रीतिवादी मूल्यांचा प्रभाव होता. र.वा. दिघे यांची 'पाणकळा' (१९४०), सराई (१९४३), ग.ल. ठोकळांची गावगुंड (१९४५), श्री.ना. पेंडसेंची 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), गो.नी. दांडेकरांची 'शीतू' (१९५२), 'पवनकाठचा धोंडी' (१९५५), व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' (१९५५), रणजित देसाई यांची 'माझा गाव' (१९६०) अशी काही उदाहरणे देता येतील.

१९६० नंतर मात्र ग्रामीण कादंबरीने सामाजिक वास्तवाचे आशयिक मूल्य स्वीकारले आणि स्थलकालाच्या परिघात बदलत्या मानवी जीवनाची सूक्ष्म संवेदनशीलता व्यक्त केली. उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०), पेंडसेची 'रथचक्र' (१९६३), शंकर पाटीलाची 'टारफुला' (१९९४), हमीद दलवाईंची 'इंधन' (१९८५), शंकर खंडू

पाटलांची 'सरपंच' (१९६९) अशा काही कादंबरीकारांच्या साहित्यकृतीची उदाहरणे देता येतील. १९७० नंतर मात्र प्रतिभावंत कादंबरीकार म्हणून आनंद यादव व रा.रं.बोराडे यांनी ग्रामीण कादंबऱ्या लिहल्या आणि ग्रामीण कादंबरीला वास्तवाची प्रखर जाणीव करून दिली. आनंद यादवांची 'गोतावळा' (१९७३), ही कादंबरी एकूणच मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात एक क्रांतीकारी टप्पा आहे. त्याचबरोबर रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' ही कादंबरीही याच पद्धतीची आहे.

१९७५ नंतर मात्र ग्रामीण कादंबरीकारांची नवशिक्षित नवी पिढी उदयाला आली आणि ग्रामीण कादंबरीचे दालन अधिक समृद्ध झाले. दलित, आदिवासी, बहुजन अशा विविध स्तरातून आलेले कादंबरीकार ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म वास्तव कठोर पद्धतीने साकार करताना दिसतात. अशाप्रकारे ग्रामीण कादंबरीची वाटचाल ही अतिशय चांगल्याप्रकारे चालल्याचे आपणास पहावयास मिळते.

**ग्रामीण कादंबरीतील ग्रामीणता :**

मराठी ग्रामीण कादंबरीही ग्रामीणेतून साकारत असते. ग्रामीण जीवन शब्दबद्ध करणे हाच तिचा मुख्य हेतू असतो. ग्रामीण जीवनातील चालीरीती, रूढी-परंपरा, सुख-दु:खे, व्यथा-वेदना मांडून ती आकारबद्ध होते. अस्सल ग्रामीणता कादंबरीत चित्रित झाली तरच ती कादंबरी जिवंत वाटते. लेखक ज्या ग्रामीण परिसरात वाढलेला, जन्मलेला, घडलला असतो. जो परिसर त्याच्या मनावर कोरलेला असतो. त्याला बाजूला ठेवून लेखन करणे ग्रामीण लेखकाला शक्यच नाही. ग्रामीणतेबद्दल आनंद यादव म्हणतात, 'ग्रामीणता हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग मानावा लागतो. ग्रामीण जीवन समजून घेऊन त्या जीवनाच्या अंगानेच स्वत: त्या विषयाचे आकलन मांडत जाणे, त्या अंगानेच अनुभवांचे आकार शोधणे, अनुभवांची मांडणी करणे हेच ध्येय समजून जेव्हा साहित्यनिर्मिती होते, तेव्हाच तिच्यात ग्रामीणतेचे रंग उतरू लागतात.''[१६] तर रा.ग. जाधव म्हणतात, ''ग्रामीणता हा मराठी जीवनाचा समांतर अंगभूत घटक आहे. व मराठी सारख्या जिवंत, प्रगमनशील,

वाङ्.मयपरंपरेला या घटकाला संपूर्णपणे डावलणे अशक्य आहे.''[१७] वरील समीक्षकांच्या विचारातून ग्रामीणता नेमकेपणाने स्पष्ट होताना आपल्याला दिसून येते. कारण भारत हा कृषिसंस्कृतीचा देश असून बहुंताश परिसर हा कृषिनिष्ठ आहे. कृषिशी निगडीत असलेल्या ग्रामव्यवस्थेतील शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे, लहानमोठ्या व्यावसायिकांचे जगणे हेच ग्रामीण संस्कृतित घडत असते.

ग्रामीण कादंबरीचे आशयिक मूल्य हे 'ग्रामीणता' हेच आहे. आणि ग्रामीणता ही ग्रामीण कादंबरीची खरी ओळख आहे. ग्रामीणता आपल्या अस्सल अशा भाषिक उमेदीसह कादंबरीत साकार होत असते. ग्रामीण कादंबरीत ग्रामीणता ही अलिकडच्या काळात एक अनोखा साज घेऊन येऊ पहाते आहे. त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' हमीद दलवाईची 'इंधन', रा.रं.बोराडेंची 'पाचोळा', उद्धव शेळकेंची 'धक', मर्ढेकरांची 'तांबडी माती', आनंद यादवांची 'गोतावळा', ना.धों.महानोरांची 'गांधारी' इत्यादी कादंबऱ्यांमधून खऱ्या अर्थाने ग्रामीणता आलेली आपणास दिसून येते. ग्रामीणता हे ग्रामीण कादंबरीचे अंगभूत मूल्य मानले आणि या अंगभूत मूल्यांचा आविष्कार करणारी कादंबरी ही ग्रामीण कादंबरी आहे असे मानले तर आपल्याला ग्रामीणतेबाबत, प्रादेशिकतेबाबत तसेच एकूण ग्रामीण कादंबरीबाबत येणाऱ्या शंका निघून जातील.

ग्रामीण कादंबरीतील ग्रामीणतेचा विचार करता ग्रामीण कादंबरीमध्ये पुढीलप्रमाणे ग्रामीणता स्पष्ट झालेली असते. ग्रामीण जीवन शेती, निसर्ग, गावगाडा, ग्रामीण संस्कृती, कुटुंब व्यवस्था, जातीरचना यांवर अवलंबून असते. ग्रामीण म्हणजे गाव खेडे असा अर्थ अभिप्रेत असतो. अशा ग्रामीण जीवनातील खेड्याचे चित्रण ग्रामीणतेमधून ग्रामीण कादंबरीकार साकारत असतात. ग्रामीणतेबद्दल त्रि.ना. अत्रे यांनी आपल्या गावगाड्यामध्ये संपूर्ण व स्पष्टपणे विवेचन केले आहे.

## ग्रामीण कादंबरीचा रूपबंध :

"आशयद्रव्य, भाषिकद्रव्य, आविष्कारांची तंत्रे आणि शैली यांच्या एकत्रित रसायनातून कादंबरीचा रूपबंध साकार होतो."[१८] नेमाडे यांची रूपबंधाबद्दलची कल्पना ही नेमक्या स्वरूपाची आहे. सर्व घटकांमधून खऱ्या अर्थाने कादंबरीचा रूपबंध साकारला जातो. वरील सर्वघटक हे कादंबरीसाठी आवश्यक असतात. असे असले तरी मराठी कादंबरीत एकूणच रूपबंधाची निर्मिती अतिशय क्षीण स्वरूपात आढळते. मराठी कादंबरीत त्याचप्रमाणे ग्रामीण कादंबरीतही यावा तितक्या ताकदीने रूपबंध आकार घेताना दिसत नाही. मराठी ग्रामीण कादंबरी लिहणारे बहुतांश लेखक हे लघुकथाकार आहेत. हेच लघुकथाकार पुढे कादंबरीचीही निर्मिती लघुकथेसारखीच करू लागले. मराठीतील बहुतांश ग्रामीण कादंबऱ्या ह्या लघुकथांचा विस्तार करणाऱ्या, निव्वळ वास्तवाचे वर्णन करणाऱ्या वर्णनात्मक कादंबऱ्या आहेत. १९८० मध्ये आनंद यादवांनी, "लघुकथेसारखा स्फुट प्रकारच हाताळण्याच्या अनुकरणातून अजून नवा ग्रामीण साहित्यिक अडकलेला आहे." अशी तक्रार नोंदवली आहे. यादवांची ही नोंद अतिशय नेमकेपणाने ग्रामीण लेखकांची मनोवस्था स्पष्ट करणारी आहे. उदा. व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा', सदानंद देशमुखांची 'तहान' प्रतिमा इंगोले ची 'बुढाई' अशी अनेक उदाहरणे कथेचा आवाका असणाऱ्या ग्रामीण कादंबरीची आहेत.

ग्रामीण कांदबरीचा रूपबंध साकार करताना 'ग्रामीणता' हे मूल्य भाषिक माध्यमांच्या अविष्कारातून सिद्ध होताना दिसते. ग्रामीण समाजाची भाषा ही बोलीभाषा असते. आणि बोली भाषेचा वापर हा कादंबरीत होणे आवश्यक असते. कारण कादंबरी यशस्वी होण्यासाठी 'निवेदन, संवाद, घटना प्रसंगाची मांडणी वगैरे घटक हे ग्रामीण बोलीभाषेचा मूळ स्वर जिरवून कादंबरीच्या रूपबंधात साकार झाले पाहिजेत. म्हणजे हे रूपबंधात्मक दृष्ट्या योग्य होईल.

ग्रामीण कादंबरीचे आशय द्रव्य म्हणजेच आशयिकता ही अस्सल ग्रामीणत्व प्रकट करणारी तसेच ग्रामीण संवेदना प्रकट करणारी असायला हवी. त्याचबरोबर भाषेच्या बाबतीतही तेच आहे की, ग्रामीणांची बोलीभाषा ही तिच्या जिवंत जाणीवांसाह साहित्यात प्रकट व्हायला हवी. तसेच ग्रामीण कादंबरीच्या आविष्काराची तंत्रेही ग्रामीणत्त्वाशी एकरूप होणारी असायला हवीत. तेव्हाच ग्रामीण कादंबरी रूपदृष्ट्या योग्य होईल. मराठीमध्ये रूपदृष्ट्या काही कादंबऱ्या यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येते. उदा. आनंद यादवांची 'गोतावळा', अशा कादंबऱ्या ह्या रूपदृष्ट्या ग्रामीणत्वाचा साज घेऊनच अवतीर्ण झाल्या.

**ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये :**

मराठी ग्रामीण कादंबरीची काही वैशिष्ट्ये आपल्याला आढळून येतात ती पुढीलप्रमाणे–

**१) ग्रामीण कादंबरीतील भौगोलिकता :**

विशिष्ट भूभागाचे चित्रण असणे हा प्रादेशिक साहित्याचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. प्रदेश म्हणजे भूभाग आणि एका भूभागाची तेथील जीवनाची वैशिष्ट्ये म्हणजे प्रादेशिकता. प्रादेशिकतेत सर्वप्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे भौगोलिकता. मराठीत प्रदेश हा शब्द प्रांत या अर्थाने वापरला जातो. हा प्रदेश यंत्रयुगापासून आणि सोयीसमृद्धी पासून अत्यंत दूर आणि आडवळणी असतो. प्रत्येक मनुष्याच्या जीवनात आपल्या प्रदेशाविषयी जवळीक, प्रेम, आपुलकी निर्माण होते. या सर्वांमधून कादंबरीमध्ये भौगोलिकतेचे उत्कट दर्शन झाल्याचे दिसून येते.

**२) मराठी ग्रामीण कादंबरीमधील सामुदायिकता :**

कादंबरीमध्ये भौगोलिक प्रदेशाला असे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे सामुदायिकतेलाही महत्त्व आहे. शहरी माणसांशी तुलना करता ग्रामीण माणूस हा समाजाचा एक घटक म्हणून समाजाशी अधिक बांधलेला असतो. संपूर्ण गाव जणू काही एक मोठे कुटुंबच आहे. अशी ग्रामीण समाजाची रचना असते. गावात कितीही भांडणे असली तरी संकटकाळी संपूर्ण गाव

एकत्र येतो. गावातील सण, उत्सव, विधी, जत्रा ह्या सामुदायिकरीत्या केल्या जातात. ही सामुदायिकता ग्रामीण कादंबरीत चित्रित होते.

**३) ग्रामीण कादंबरीतील भाषाशैली आणि बोलीभाषा :**

ग्रामीण कादंबरीचे प्रत्ययकारी चित्रण ग्रामीण बोलीभाषेतून होते. स्थानिक भाषेला ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. ग्रामीण माणसाच्या जीवनाचे चित्रण बोलीभाषेद्वारे होते. ग्रामीण भाषा ग्रामीण अनुभवांशी निगडीत आहे. ग्रामीण संवादातून व्यक्तिचित्रे नीटपणे उभी राहतात. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण भाषा यांचा निकटचा संबंध आहे. ग्रामीण साहित्याची भाषा, ग्रामीण कादंबरीतून प्रकट होणारे ग्रामजीवन, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार यातून स्पष्ट होते. म्हणून अस्सल ग्रामीण कलाकृती ग्रामीण बोलीतच आढळते.

**४) ग्रामीण कादंबरीतील कृषिजीवन :**

भारतीय ग्रामीण संस्कृतीही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषिकेंद्रित संस्कृती आहे. कृषिकेंद्रीत रचना हे ग्रामसंस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्ये होय. म्हूणन शेती आणि शेतकरी हा ग्रामसंस्कृतीचा प्रमुख घटक म्हणता येईल. एकूणच ग्रामीण जीवनामध्ये शेती, शेतीशी निगडीत निसर्ग, कालचक्र, जनावरे, पीके, गावातील अलुतेदार-बलुतेदार या सर्व घटकांचा समावेश आपण कृषिसंस्कृतीत करतो. त्यामुळे या सर्व घटकांभोवती कादंबरीकार आपले विचार कादंबरीतून मांडत असतो.

**५) ग्रामीण कादंबरीतील ग्रामीण संस्कृती आणि रूढीपरंपरा :**

ग्रामीण साहित्यात संस्कृतीना, रूढींना, परंपरांना, अनन्य साधारण महत्त्व आहे. शेतकरी निसर्गावर अवलंबून असतो. ग्रामीण लोकांच्या जीवनात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, चालीरीती यांना महत्त्व असते. यांच्याविरूद्ध जो जाईल त्याला गावातील लोक वाळीत टाकतात. त्यामुळे ग्रामीणांचे सण, उत्सव, देव-देवता, पूजा-अर्चा, हे सर्व विशिष्ट रितीरीवाजाप्रमाणे करतात. यातून त्यांची संस्कृती आकाराला येते. त्याचे प्रत्ययकारी चित्रण ग्रामीण कादंबरीत येते.

### ६) ग्रामीण कादंबरीतील खेड्यांची रचना व ग्रामजीवन :

निसर्ग सान्निध्यात ग्रामीण खेडी वाढत असतात. प्रत्येक गावामध्ये अनेक जातीजमातीचे लोक राहत असतात. त्यामुळे खेड्यांची रचना शहरी रचनेपेक्षा भिन्न व वेगळी असते. गावातील रस्ते, घरे, चावडी, देवाचे मंदिर, तालीम, गुरांचे गोठे, यांची रचना विशिष्ट प्रकारे केलेली असते. तसेच गावातील असणारे बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार या सर्वांगातून ग्रामीण जीवन व त्याची रचना दिसून येते. याचे यथासांग चित्रण आपल्याला मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये घडल्याचे दिसून येते.

### ७) मराठी ग्रामीण कादंबरीतील कुटूंब व्यवस्था :

ग्रामीण साहित्याचा विचार करत असताना कुटूंबव्यवस्था हाही साहित्याचा महत्त्वाचा गुणविशेष आहे. खेड्यातील कुटूंबव्यवस्था ही एकत्र कुटूंबव्यवस्था असते. या एकत्रित कुटूंब पद्धतीमध्ये कुटूब प्रमुखाला महत्त्वाचे स्थान असते. शेतीतील कामे करण्यासाठीही माणसांची आवश्यकता असते. एकत्र कुटूंब पद्धतीमुळे अशाप्रकारची कामे व अनेक महत्त्वाच्या गोष्टी होत असतात. त्यामुळेच ग्रामीण कादंबरीत कुटूंबाचे चित्रण येणे अपरिहार्य असते.

वरीलप्रमाणे अनेक वैशिष्ट्ये आपल्याला ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत सांगता येतात.

## मराठी ग्रामीण कादंबरीची निर्मिती ते इ.स.१९५० :

मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीपासून ते इ.स. १९५० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचा प्रवास बघावयाचा असल्यास या कालखंडात लिहिल्या गेलेल्या ग्रामीण मराठी कादंबरीतील पहिल्या कादंबरीच्या प्रवासापासून विचार करावा लागेल. मराठी ग्रामीण कादंबरीची सुरवात ही १८८७ मध्ये निर्माण झालेल्या कादंबरीने इ.स. १८७७ मध्ये पडलेल्या दुष्काळाची दयनीय स्थिती वर्णिलेली आहे. 'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' या कादंबऱ्यांनी गावातील पाटील, शेतकरी, शेतमजूर या तीन महत्त्वाच्या घटकांच्या

संदर्भानुसार दुष्काळानंतर गावात होणाऱ्या परिवर्तनाचा व समस्येचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्यानंतर काही मराठी ग्रामीण कादंबरी लिहिली गेली नाही.

यानंतरच्या काळात प्र.ह. खाडिलकारांची 'स्वाधीन संसार' (१९२७), भा.वि. वरेरकरांची 'सातलाखातील एक' (१९३०), रा. शा.पाटील यांची 'सीता' (१९३१), ग.रा.वाळींबे यांची 'मोहित्यांची मंजुळा' (१९३१), वि.वा.हडप यांची 'अन्नदाता' 'उपाशी' (१९३७) इत्यादी कादंबऱ्यांची निर्मिती झाली. यानंतर र.वा. दिघे यांची 'पाणकळा' (१९३९) या कादंबरीने शेतकऱ्यांचे प्रश्न काव्यात्म शैलीत मांडले. यांनतर वि.ल. बर्वे यांची 'मुचकुंदसरी' (१९४०), म.भा.भोसले यांची 'समरांगण' (१९४१), द.र.कवठेकर यांची 'रेशमाच्या गाठी', वि.स.चिंदरकर यांची 'महापूर' (१९४३), व बा.सी.मर्ढेकर यांची 'तांबडी माती' (१९४३), र.वा.दिघे यांची 'सराई' (१९४३), ग.ल.ठोकळांची 'गावगुंड' (१९४५), शिरवाडकरांची 'वैष्णव' (१९४५), मर्ढेकरांची 'पाणी' (१०४८) इ. कादंबऱ्यांनी जीवनातील वास्तवता व रौद्रभीषण चित्रणात आधुनिकीकरणने उद्‌ध्वस्त होणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. तरीही ह्या कादंबऱ्या ग्रामीणतेच्या खऱ्याखुऱ्या वास्तवाला भिडू शकल्या नाहीत.

मात्र याच कालखंडातील श्री. ना. पेंडसेंच्या 'एल्गार' (१९४८), 'हद्दपार' (१९५०) या निर्माण झालेल्या कादंबऱ्यांनी हर्णेचा परिसर जिवंत करून सोडला. याचबरोबर बा.भ.बोरकर यांची 'भावीण' (१९५०) व मधू मंगेश कर्णीक यांची 'वाडगीण' (१९५०) यामधून ग्रामीण भागातील अंधश्रद्धाळू जीवनाच्या वेदनांना वाट करून दिली आहे. याच कालखंडातील लक्षणीय ठरलेली कांदबरी म्हणजे विभावरी शिरूरकरांची 'बळी' (१९५०), ही कादंबरी होय. या कादंबरीत साकारलेली 'आबा' ही व्यक्तिरेखा वाचकांच्या मनात कायमचेच घर करते.

सुरवातीला ग्रामीण कादंबरीमध्ये स्वप्नरंजकता असल्याचे दिसून येते. त्यानंतर मात्र ग्रामीण साहित्य हे खऱ्या अर्थाने माणुसकीचे साहित्य आहे हे लक्षात घेऊन माणूस

आणि निसर्ग, माणूस आणि समाज, माणूस आणि विश्व, माणूस आणि कुटूंब व माणसांमाणसातील विविध नात्यांची गुंफण या कादंबऱ्यांनी प्रकट केली. याच कालखंडामध्ये ग्रामीण भागामध्ये हळुहळू शिक्षणाचे महत्त्व पटू लागले. ग्रामीण भागातील लोक आपल्या मुलांना शिक्षण देऊ लागले. सुशिक्षित पिढी आपल्या जीवनातील व्यथा, वेदना आपल्या साहित्यात मांडू लागली. असे जरी असले तरी ह्या कालखंडातील लेखकवर्ग हा उच्च व प्रतिष्ठित घराण्याशी संबंधित असल्याने त्यांच्या साहित्यामधून जुन्याच खेड्यांचे चित्रण केल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळेच 'आजच्या ग्रामीण साहित्यातील ग्रामीण जीवनाचे दर्शन आजचे वाटण्यापेक्षा कालचेच वाटते.''[१९] असे म्हणण्याची वेळ आली. या कालखंडात काही लेखक स्वप्नरंजनात रमणारे असले तरी ठोकळ, दिघे, मर्ढेकर, पेंडसे, शिरवाडकर, शिरूरकर यांसारख्या महत्त्वाच्या लेखकांनी खेड्यांची ओळख बऱ्यापैकी वास्तव पातळीवर येऊन दिल्याचे दिसून येते.

## १९५१ ते १९७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचा प्रवास :

या कालखंात मात्र ग्रामीण कादंबरी बहरल्याचे आपणास दिसून येते. काही जुन्या व नव्या कादंबरीकारांनीही जवळपास पन्नासच्या आसपास कादंबऱ्यांची निर्मिती केलेली आहे. त्यामध्ये अस्सल ग्रामीण म्हणण्यासारख्या केवळ दहाबाराच ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यामध्ये 'गारंबीचा बापू' (१९५२) तसेच त्यांच्या एल्गार, हत्या, रथचक्र या कादंबऱ्यातूनही कोणकच्या पार्श्वभूमीवर आधारीत प्रत्ययकारी निसर्गचित्रणे आली आहेत. त्याचबरोबर गो.नी.दांडेकर यांनी शीतू (१९५२), 'पडघवली' (१९५५), 'कुण्या एकाची भ्रमणगाथा' (१९५८), 'माचीवरचा बुधा' (१९५८), पूर्णामायेची लेकरे (१९५९), 'पवनकाठचा धोंडी' (१९५५) इत्यादी कादंबऱ्यांमधून त्यांनी विदर्भ, नौखली, भाकडा-नांगल, नर्मदेचा परिसर इ. प्रदेशातील निसर्ग वर्णनाबरोबरच संस्कृतीचेही दर्शन घडविले आहे.

त्याचप्रमाणे १९५० मधील विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' ह्या कादंबरीने मराठी कादंबरीला एक वेगळी दिशा दिली. ह्या कादंबरीनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. गुन्हेगार म्हणून मानल्या गेलेल्या मांग-गारूडी समाजाच्या जीवनावर आधारित असणाऱ्या या कादंबरीचा नायक 'आबा' याच्या जीवनाची ही शोकात्म अशी कहाणी आहे. जीवन बदलू पाहणाऱ्या आबाच्या जीवनाचा करूण अंत अशी ह्दयस्पर्शी व मनात कायमचेच घर करणारी कादंबरी आहे. बळीच्या संदर्भात कुसुमावती देशपांडे म्हणतात, "१९५४ च्या आसपास दोन तीन वर्षात मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसू लागली आहे. या नव्या जाणीवेचा स्पष्ट अधिकार ज्यात होतो. त्यापैकी 'बळी' ही एक अग्रगण्य कादंबरी आहे."[२०] बळीच्या बाबतीतचे हे विधान अगदीच नेमकेपणाने झाल्याचे दिसते. कारण मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये 'बळी' ही कादंबरी मैलाचा दगड ठरली आहे.

श्री.ना.पेंडसे, गो.नी. दांडेकर यांच्याबरोबरच बिनीच्या कथाकारातील कथाकार व्यकंटेश माडगूळकर यांनाही ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पुढचं पाऊल' (१९५०) ही त्यांची पहिलीच कादंबरी, त्यानंतर ग्रामीण कादंबरीत मैलाचा दगड ठरलेली त्यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी कायमचीच लक्षात राहणारी, या कादंबरीत संपूर्ण बनगरवाडी भोवती फिरणारं चित्रण आहे. यामध्ये दुष्काळाच्या अवस्थेचे चित्रण ह्दय हेलावून टाकणारं आहे. या कादंबरीतून संपूर्ण गावगाडाच आपल्यासमोर उभा राहतो. तेथील लोकांचे सण, उत्सव, पारंपरिक विधी. यामध्ये असणारी त्यांची श्रद्धा या साऱ्या गोष्टींचे वर्णन ह्दयस्पर्शी असेच झाले आहे. त्यानंतर त्यांनीच 'वावटळ', कोवळे दिवस, करूणाष्टक या कादंबऱ्या लिहिल्या व ग्रामीण कादंबरीत भरच टाकली.

आण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा (१९५९) मधून खेड्यापाड्यातील धर्म, श्रद्धाळूपणा त्यानुसार करण्यात येणारे धार्मिक विधी, रूढी, परंपरेनुसार गावातील व्यवसाय, दरोडे, न्याय इत्यादीसाठी होणारे आपआपसातील संघर्ष, शूरवीर व्यक्तिमत्त्वे, त्यांची प्रेमळ वागणूक, एकजुटीने राहणे, दिलदार व्यक्तीमत्त्व व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण भाषा इ. वैशिष्टये व्यक्त होतात. आण्णाभाऊंप्रमाणेच उद्धव शेळके यांच्या 'धग' (१९६०) या कादंबरीने

ग्रामीण कादंबरी विश्वाला समृद्ध केले. या कादंबरीमुळे मराठी व ग्रामीण कादंबरीला अस्सल ग्रामीणत्त्व उपभोगायला मिळाले. या कादंबरीत आधुनिकीकरणामुळे पिडीत झालेल्या एका कुटूंबाचे दु:ख व त्या कुटूंबाच्या अनुषंगाने होणारे गावाचे व तेथील संस्कृतीचे चित्रण केले आहे.

या महत्त्वपूर्ण कादंबरीप्रमाणेच रणजीत देसाई यांची 'बारी' (१९५९), 'माझा गाव' (१९६०), चंद्रकांत काकोडकर यांची 'अन्नपूर्णा' (१९६०), बाजीराव पाटील यांची 'भंडारवाडी', दि.बा. मोकाशी यांची 'देव चालले' (१९६१), रंगनाथ देशपांडे यांची 'वेडी बाभळ' (१९६६), लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दूर गेलेल घर' (१९७०), द.ना. भोसले यांची 'मी आणि माझा बाप' (१९७०), गो.नी. दांडेकरांची जैत रे जैत (१९६५), चिं.त्र्यं. खानोलकर यांची 'रात्र काळी घागर काळी' (१९६३), 'कोंडुरा' (१९६६), 'चानी' (१९७०) यातून होणारे कोकणचे दर्शन. त्याचबरोबर शंकर खंडू पाटील यांची 'सरपंच' (१९६९), जयवंत दळवी यांची 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४) इ. ग्रामीण वास्तवाला सामोरे जाणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली.

याच कालखंडामध्ये शंकर पाटील यांची 'टारफुला' (१९६४) व हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६५), या कादंबऱ्या ग्रामीण कादंबरी विश्वात स्वत:ची वेगळी ओळख करून देणाऱ्या ठरल्या. शंकर पाटील व हमीद दलवाई यांनी ग्रामीण भागात सत्तेसाठी होणारा संघर्ष व सत्तेच्या राजकारणातून निर्माण होणारी गावामधील विध्वंसक पिरिस्थिती अतिशय भावपूर्णरित्या वास्तव पातळीवर येऊन मांडल्याचे आपल्याला दिसून येते.

अशाप्रकारे १९५१-७० या कालखंडात आण्याभाऊ साठे, उद्धव शेळके, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, र.वा.दिघे, शंकर पाटील, हमीद दलवाई व व्यंकटेश माडगूळकर इ. प्रतिभासंपन्न लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीच्या अवकाशात अनेक चांगल्या कादंबऱ्यांची निर्मिती केली.

## १९७१ ते आजपर्यंतच्या ग्रामीण कादंबरीचा प्रवास :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुरवातीच्या दोन शतकांमध्ये चांगल्या प्रकारच्या ग्रामीण कादंबरीची निर्मिती झाली. ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने कात टाकू लागली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शेतकऱ्यांच्या स्थितीत व हालअपेष्टांमध्ये जरी फारसी सुधारणा झाली नसली तरी ग्रामीण भागातील खेड्यपाड्यापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचली. खेड्यापाडयातील झोपडीत दिव्याच्या उजेडात अनेक ग्रामीण तरूण ज्ञानाची कवाडे उघडून वाचू लागले. आत्मसात करू लागले. शेतीवाडीवर जीवन कं ठणाऱ्या ग्रामीण तरुणांची शिक्षणामुळे फुले, आंबेडकर, गांधीजी, शाहू, कर्मवीर, वि.रा.शिंदे यांच्या विचारांची ओळख झाली व त्या भावनेतून प्रेरित होऊन ग्रामीण भागातील ही नवीन रानपाखरे आपल्या प्रतिभासंपन्न मनातून आपलं रोजचचं जगणं वास्तवपातळीवर मांडायला लागली व त्यातूनच अस्सल ग्रामीण कादंबरी जन्म घेवू लागली.

स्वातंत्र्योत्तर दोन शतके उलटली तरी स्वातंत्र्याचा शेतकऱ्यांना विशेष फायदा झालाच नाही. त्यांचे जीवन आजही पूर्वीसारखेच पशूपातळीवरचे चालले आहे. उलट आज अनेक समस्या, बेरोजगारी, लोकसंख्या वाढ, अंधश्रद्धेचे वाईट परिणाम हे आजही ग्रामीण भागातील मुलभूत असे प्रश्न आहेत. ''स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खेडेगाव बदलले असे वाटते. पण त्याचे मुखपृष्ठ तेवढे बदलल्यासारखे वाटते. खऱ्या अर्थाने खेडे बदललेले नाही. त्याचे अंतरंग बदललेले नाही.''[२१] या कालखंडाचे वर्णन त्यानंतरच्या अनेक प्रतिभासंपन्न कादंबरीकारच्या कादंबऱ्यातून साकारल्याचे आपणास दिसून येते. या कालखंडाच्या प्रारंभीच रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१) ही शहरीकरणामुळे उजाड होत चाललेले पारंपरिक व्यवसाय आणि त्यावर उपजीविका करणाऱ्या कुटूंबाची होत असलेली वाताहात याचे हृदयस्पर्शी चित्रण करणारी अशी कादंबरी आहे. तसे पाहिल्यास 'पाचोळा' मधील कथा ही सत्यकथेवर आधारीत आहे. अशाप्रकारे मराठी ग्रामीण कादंबरी अधिकच वास्तवात डोकावू लागली.

यानंतरच्या काळात मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये मैलाचा दगड ठरलेली कादंबरी म्हणजे आनंद यादवांची 'गोतावळा' (१९७१) ही होय. या कादंबरीत नारबा व त्यांचा जो गोतावळा आहे. त्यामध्ये नारबाचे बैल, रेडा, घोडे, कोंबडा, शेरडे व विहिरीतील कासव यांच्या सोबत नारबाचे मैत्रिचे नाते दर्शवून यादवांनी नारबाचे जीवनही ह्या प्राण्याप्रमाणेच आहे. हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीचे कथानक हे यंत्रयुगाने ग्रामीण भागात झालेल्या स्थित्यंतराचे व त्यामुळे ग्रामीण भागातील हरवलेल्या माणुसकीचे, बोथट झालेल्या ग्रामीण संवदेनचे व त्यातून ससेहोलपट होणाऱ्या सर्वसामान्य शेतमजूराचे, शेतातील गड्यांचे, प्राण्यांचे कशापद्धतीने अमानुष हाल होतात व त्यांचे भावविश्व कशापद्धतीने उदध्वस्त होते याचे प्रातिनिधिक चित्रण आनंद यादवांनी आपल्या 'गोतावळा' या कादंबरीत केली आहे.

यानंतर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वळणदार रचनेमुळे साकार झालेली ग्रामीण कादंबरी म्हणजे ना,धों. महानोरांची 'गांधारी' (१९७३) ही कादंबरी होय. ही कादंबरीही सत्तेसाठी चालणाऱ्या राजकारणामुळे उदध्वस्त होणाऱ्या गावाची शोकात्म कहाणी मांडणारी आहे. पाचोळा, गोतावळा, गांधारी या कादंबऱ्यांबरोबरच या कालखंडात आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण कादंबऱ्यांची रचना झाली. त्यामध्ये माधव यादव यांची 'बोरगाव' (१९७१), शंकर पाटील यांची 'घुंगरू' (१९७१), 'बेईमान' (१९७६) यातून ग्रामीण जीवनातील विविध घटकांचे दर्शन घडविले आहे. त्याचबरोबर रघुनाथ पाटील यांनी 'मातीत मिळाले मोती' (१९७३), महानोरांची 'पैलतीर' (१९७०), गो.नि. दांडेकरांची 'झुंझारमाची' (१९७२), ' हे तो श्रींची इच्छा' (१९७४), 'मोगरा फुलला' (१९७५), 'दास डोंगरी राहतो' (१९७८) इ. कादंबऱ्यामधून शिवकाल जिवंत केला आहे. दांडेकरांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याविषयी डॉ. रत्नाकर मंचरकर म्हणतात, ''ऐतिहासिक ग्रामीण कादंबरीची वाट तुडवू शकण्याचे बळ असलेले ते एकमेव लेखक आहेत.''[२२] 'रानफुली' (१९७८), व 'वाघरू' (१९७९) या कादंबऱ्यातून दांडेकरांनी इतिहासकालीन स्थितीलाच महत्त्व दिले आहे.

यानंतरच्या काळात ग्रामीण कादंबरीमध्ये महादेव मोरे यांची 'बळी' (१९७२), 'एकोणीसावी जात' (१९६८), 'वर आभाळ खाली धरती' (१९७९) या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनाचा पट उलघडून दाखविला आहे. याचबरोबर चंद्रकुमार नलगे यांनीही 'आगीन फुल' (१९७४), 'गस्त' (१९७९), 'देवाची साक्ष' (१९७९) या कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवन दर्शविले आहे. त्याचबरोबर जयवंत दळवी यांची 'धर्मानंद' (१९८०), बाबा भांड यांची 'जरंगा' (१९७८), व.बा.बोध यांची 'वाघिण' (१९८०) या कादंबऱ्यामधून कैकाडी, कानफाटी, गोसावी, काजारंभाट, कोल्हाटी या उपेक्षित जमातींचे चित्रण करण्यात आले आहे.

या कालखंडातील कादंबऱ्यांनी खेड्यातील अज्ञान, दारिद्र्य, शोषण यामुळे त्रस्त झालेली गरीब, श्रद्धाळू, भाबड्या, स्वभावाची व्यक्तिचित्रणे याबरोबरच सत्ता, राजकारण याला अधिक महत्त्व देणाऱ्या दृष्टवृत्तीच्या क्रुर माणसांचेही वास्तववादी चित्रण केले आहे. या पुढच्या दशकातील जुन्या कादंबरीकारांपैकी काही कादंबरीकार व काही नवीन कादंबरीकारांनी मिळून श्रेष्ठ दर्जाच्या ग्रामीण कादंबरीची निर्मिती केली आहे. यात व्यंकटेश माडगूळकर यांची 'करूणाष्टक' (१९८२), दांडेकरांची 'तुका आकाशाएवढा' (१९८१), श्री.ना.पेंडसेंची 'तुंबाडचे खोत' (१९८७), तसेच आनंद यादव यांच्या 'झोंबी' (१९८७), नांगरणी (१९९०), ह्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांचाही समावेश आहे. रा.रं.बोराडे यांच्या 'सावट' (१९८७), चारापाणी (१९८९), या कादंबऱ्यातून ग्रामीणत्वाबरोबरच राजकारण, स्त्रियांचे प्रश्न इ. बाबींनाही महत्त्व दिले आहे.

याचबरोबर उत्तर बंडू तुपे यांची 'चिपाड' (१९८९) 'खुळी' (१९९१), राजन गवस यांची 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८८) या कादंबऱ्यांमधून जोगत्यांच्या जीवनाचे भयान प्रश्न मांडले आहेत. त्याच बरोबर त्यांच्याच 'कळप' (१९९१), 'धिंगाणा' (१९९२), नागनाथ कोत्तपल्ले यांच्या 'गांधारीचे डोळे' (१९८५), आनंद पाटील यांच्या 'कागूद आणि सावली' (१९८६), मधूकर पाकोडे यांची 'झेलझपाट' (१९८८), विश्वास पाटील यांच्या 'पांगीरा' (१९९०), 'झाडाझडती', रंगनाथ पठारे यांची 'रथ' (१९८४),

'पाचर' (१९८९) इ. कादंबऱ्यामधून ग्रामीणभागातील अनेक प्रश्नांना न्याय दिला आहे. मग त्यामध्ये गावचे राजकारण असो, गावातील धर्मश्रद्धा असो, असे अनेक विषय यशस्वीरित्या हाताळल्याचे आपणास दिसून येते.

या संपूर्ण ग्रामीण कादंबरीच्या प्रवासामध्ये एकही स्त्री कादंबरीकार आढळत नाही. 'धग', 'पाचोळा' यासारख्या कादंबऱ्यामधून स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडली असली तरी प्रत्यक्षात स्त्रिया स्वत: त्या क्षेत्राकडे वळल्या नाहीत. हे इथे आवर्जून सांगावेसे वाटते. असे असले तरी या कालखंडात ज्या ग्रामीण प्रतिभावंत कादंबरीकारांनी मराठी ग्रामीण कादंबरीला समृद्ध केले त्यांचे योगदान मराठी कादंबरीसाठी फार मोलाचे ठरले आहे.

या कालखंडामध्ये र.वा. दिघे, ग.ल.ठोकळ, शंकर पाटील, उद्धव शेळके, रणजित देसाई याचबरोबर गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, रा. रं.बोराडे तसेच उत्तम बंडू तुपे, रंगनाथ पठारे, आनंद पाटील, राजन गवस, वासुदेव मुलाटे इ. नवीन कादंबरीकारांनीही आपल्या प्रतिभासंपन्नतेने मराठी ग्रामीण कादंबरी विश्वाला एक नवी दिशा दिली आहे हे मात्र निश्चितपणे म्हणता येईल.

**ग्रामिणतेचा अस्सल अविष्कार 'गावठाण' :**

शंभर वर्षाची दीर्घ परंपरा लाभलेली मराठी ग्रामीण कादंबरी काळानुरूप बदलत गेली. काळानुरूप बदलणाऱ्या भौतिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक पिरिस्थितीचा प्रभाव मराठी ग्रामीण कादंबरीवर पडल्याचे दिसून येते. मराठी ग्रामीण कादंबरीच्या विकासाचे स्थूलमानाने काही पडणारे महत्त्वाचे टप्पे आपण पाहिले. प्रत्येक टप्प्यावर बदलत जाणारी व अधिक प्रगल्भ होणारी मराठी ग्रामीण कादंबरी मराठी वाङ्.मयात एक आपला वेगळा ठसा उमटवून गेली.

ग्रामीण कादंबरी साकारणाऱ्या प्रतिथयश लेखकांमध्ये व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, रा.रं.बोराडे, उद्धव शेळके, सदानंद देशमुख, हमीद दलवाई, शंकर पाटील, ना.धों. महानोर, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर यांचा उल्लेख करावा लागेल. या लेखकांनी म. फुले,

शाहू, आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन ग्रामीण वास्तव शब्दबद्ध करायला सुरवात केली. ग्रामीण जीवनातील रोजचं जगणं, वागणं, बोलणं, ग्रामीणांची सुखदु:खे, श्रद्धा–अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, जातीरचना, व्यथा, वेदना यांचे वास्तव चित्रण करायला सुरवात केली. त्याचबरोबर ग्रामीणतेचा आत्मा असणारी शेती व तेथील शेतकरी आणि त्याचं कृषिनिष्ठ जीवन वास्तव पातळीवर येऊन मांडायला सुरवात केली. त्यामध्ये शेतीशी निगडीत असणारी पेरणी, कापणी, मळणी , पिक, बी–बियाणे, पाणी, विहिरी, नदी, बैल, म्हैस, पशूपक्षी, कुत्रे, मांजर, शेतीवाडी, शेतातील, डोंगरातील देवदेवता, ग्रामणदेवता, जत्रा, सण, उत्सव समारंभ, पाऊसपाणी, शेतकऱ्यांची निसर्गाधिनता त्यातून निर्माण होणारे दुष्काळ, ग्रामीण भागातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थिती त्यातून निर्माण होणारी स्थित्यंतरे, सावकारीचा व भ्रष्ट अशा राजकारणाचा पाश आणि त्यामध्ये होणारे सर्वसामान्यांचे हाल, जीवनाची परवड, संसाराची उद्ध्वस्तता व होरपळ, नराधमांच्या वासनांच्या शिकारी होणाऱ्या गरिबांच्या मुली, बायका, त्यातून घडणारे बलात्कार, खून, मारामाऱ्या तसेच अवघ्या ग्रामीण स्त्री जातीची सर्व बाजूंनी होणारी अवहेलना आपल्या शब्दामध्ये शब्दबद्ध केली व ग्रामीण कादंबरीला सजीवतेचा साज चढवल्याचे आपणास दिसून येते.

या सर्व वैशिष्ट्यांसह ग्रामीण कादंबरीकारांनी आपली कादंबरी साकारताना वास्तव पातळीवरील ग्रामीण जीवन कादंबरीमध्ये मांडून ग्रामीण कादंबरीचा ठसा अवघ्या मराठी वाड्.मयात उमटवला. वरील प्रतिथयश लेखकांप्रमाणे गेल्या एक–दोन दशकात अनेक नव ग्रामीण कादंबरीकार आपले जिवंत अनुभव शब्दबद्ध करून ग्रामीण कादंबरी साकारताना दिसून येतात. या नव कादंबरीकारांमध्ये संपूर्ण ग्रामीण कादंबरीला समांतर जाणारी व ग्रामीण वास्तवाच ह्दयस्पर्शी लेखन करून मराठी ग्रामीण कादंबरीत आपले एक वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान निर्माण करणारा एक नव ग्रामीण कादंबरीकार म्हणजेच कृष्णात खोत होय. त्यांनी आपल्या पहिल्याच 'गावठाण' या कादंबरीत ग्रामीण जीवन चित्रित करून मराठी ग्रामीण कादंबरीत एक आपलं वेगळ स्थान निर्माण केलं आहे.

❀

'गावठाण' ही कादंबरी अस्सल ग्रामीणत्त्वाचा उत्कट असा आविष्कार आहे. ग्रामीण जीवनाचं सर्वांगीण दर्शन करणाऱ्या व जिवंत आणि रसरशीत वाटणाऱ्या या कादंबरीच कथानक घडलय ते पन्हाळ्याच्या पायथ्याशी असलेल्या खेड्यात. कृष्णात खोतांच बालपण ज्या मातीत गेलं त्या मातीतील माणसांशी त्यांची अतूट अशी नाळ जोडलेली आहे. त्यामुळे आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या सर्व व्यथावेदना, सुख दु:ख, हालअपेष्ठा, त्यामधून जगणारा ग्रामीण माणूस. दु:खान खचून कोसळून पुन्हा पुन्हा उभी राहणारी माणसं त्यांनी जवळून पाहिली. त्याचबरोबर ग्रामीण भागातील स्त्रियांची दु:ख त्यांच्या संवेदनशील मनावर कोरली गेली. स्त्रियांच्या जीवनाची अगदी बालपणापासून होणारी उपेक्षा, त्यांच कुणावर तरी अवलंबून असणं, नियतिने त्यांना फटकारणं, दु:ख, हालअपेष्ठांना, वेदनांना घेऊन सतत जगणं, आलेले कढ दाबून अश्रूंना डोळ्यातच ठेवण, मुलाबाळांच्या आणि नवऱ्याच्या संगोपनात उभ आयुष्य चंदनासारख झिजवणं अशाप्रकारे स्त्रियांच्या होणाऱ्या जीवनाची परवड कृष्णात खोतांनी अगदी जवळून पाहिली आहे. स्त्रियांच्या मनाची घालमेल, कुचंबना, त्यांच समर्पण हे त्यांनी अनुभवलेलं होतं. अशाच सर्व प्रकारच्या दु:खांना सामोऱ्या जाणाऱ्या, जीवनाशी तसेच नियतीशी समर्थपणे लढणाऱ्या, जीवनात कोसळून पुन्हा पुन्हा उभ्या राहणाऱ्या एका ग्रामीण स्त्रिला त्यांनी आपल्या कादंबरीतून मांडल्याचे दिसून येते.

रा.रं.बोराडे यांच्या 'पाचोळा' मधील 'पार्वती' तसेच उद्धव शेळकेंच्या 'धग' कादंबरीतील कौतिक यांचा जसा जीवनसंघर्ष लेखकांनी वास्तवरूपात येऊन साकारलेला आहे अगदी त्याचपद्धतीने कृष्णात खोतांनी आपल्या 'गावठाण' कादंबरीतून आनंदी नावाच्या स्त्रिच्या जीवनसंघर्षाची कहाणी आपल्या प्रतिभासंपन्न तसेच संवेदनशील मनातून साकारलेली आहे.

दु:सह दारिद्रयात जन्मलेल्या, संकटांना सतत सामोऱ्या जाणाऱ्या त्याचबरोबर उपजत शहाणपण असलेल्या आनंदी नावाच्या दु:खी मुलीची, तिच्या उलघाल करणाऱ्या जीवनानुभवाची कहाणी मनाला विषण्ण करून चटका लावून जाणारी आहे. आनंदी समवेत

तिचे साधेसुधे कष्टकरी आईवडील, धाकटा भाऊ, मैत्रिणी, सगेसोयरे, दुरावलेलं सासर, याचबरोबर भोवतीच्या गावगाड्याच ह्दयस्पर्शी चित्रण या कहाणीमध्ये येतं. पिक, गुरढोर, पशुपक्षी, झाडझुड, डोंगरदऱ्या, वाऱ्याचा भरार, निर्मळा नदी, कौलदेणारी तांबुजाई आदींच विलक्षण दर्शन घडत. मानवी नात्यातील भावभावनांच भीषण आणि कोमलही रूप प्रकट होतं. आणि एक अख्खं अनोळखी खेडं आपल्या ओळखीच होऊ लागत.

अशाप्रकारे अस्सल ग्रामीणत्वाला स्पर्श करणारी ही कादंबरी वाचकांच्या मनाचा ठाव घेते. एकूणच ग्रामीण कादंबरीला समांतर जाणारी ही कादंबरी असून, ग्रामीण कादंबरीत येणाऱ्या सर्वच वाङ्.मयीन वैशिष्ट्यांना या कादंबरीत स्पर्श केल्याचे दिसून येते. ही कादंबरी वाचत असताना संपूर्ण गावगाडाच आपल्या समोर उभा राहतो. कृष्णात खोतांनी यामध्ये चित्तारलेले प्रसंग एवढे जिवंत वाटतात की ते वाचत असताना ह्दयाची घालमेल होते. आणि काही प्रसंगी नकळत डोळे पाण्याने भरून येतात. एवढे वास्तवपूर्ण जिवंत अस चित्रण या कादंबरीत कृष्णात खोतांनी केलेलं आहे. कुठल्याही पारंपारिक संस्काराचा स्पर्श नसलेली सहजपणे उलघडत आलेली ही स्वयंभू कादंबरी मराठी ग्रामीण साहित्याचा नवा टप्पा गाठत असल्याचे आपण दिसून येते.

## 'गावठाण' मधील प्रातिनिधिक ग्रामीण स्त्री :

कृष्णात खोतांनी आपल्या गावठाण कादंबरीत एका दु:खी स्त्रिची शोकात्म कहाणी चित्रित केली आहे. तसे पाहिल्यास ही स्त्री संपूर्ण ग्रामीण स्त्रीचं प्रतिनिधित्त्व करताना दिसून येते. कारण हिच्या जीवनात येणाऱ्या घटना, प्रसंगांना, सुख दु:खांना, व्यथा वेदनांना, अनेक ग्रामीण स्त्रियांना सामोरे जावे लागते. अशा अनेक घटना प्रसंगातूनच ग्रामीण स्त्रीचं जीवन तावून सूलाखून निघत असतं या कादंबरीत येणारी स्त्री ही 'आनंदी' नावाची असली तरी अस्सल ग्रामीणत्वाचा आविष्कार म्हणून संपूर्ण कादंबरीत ती 'आंदी' म्हणून वावरताना आपल्याला दिसून येते. आंदीच जीवन म्हणजे एक नियतीशी केलेली संघर्ष यात्राच आहे. तिच्या जीवनात एका पाठोपाठ असे प्रसंग येत जातात की प्रत्येक प्रसंग तिची सत्वपरीक्षाच

पहाणारा ठरतो. अशाही परिस्थितीत पुन्हा पुन्हा ती न कोलमडता उभी राहून लढताना दिसते. तिच्या दु:खमय अशा जीवन कहाणीतील तिने केलेल्या संघर्षातून तिच्या कणखरपणाची जाणीव होते.

कादंबरीची नायिका असणारी 'आंदी' ही अठराविश्वे दारिद्रयात असणाऱ्या घरात जन्म घेते. सतत कुठल्या ना कुठल्या प्रसंगांना या कुटूंबाला सामोरे जावे लागते. अशा कुटूंबात जन्मलेली आंदी ही उपजत शहाणपण लाभलेली मुलगी आहे. लहाणपणी माळावर गुरढोरं चारायला घेऊन जाणारी ही आंदी हिचा शाळेशी किंवा शिक्षणाशी कधीच संबंध आला नाही. रोजच्या घडणाऱ्या प्रसंगातूनच ही जीवनाचे धडे शिकत होती. तिचा साऱ्या गुराढोरांवर, शेरडांवर खूप खूप जीव होता. गुरढोरं घेऊन जाणाऱ्या व तिच्या सोबत नेहमी असणाऱ्या काही जिवलग मैत्रिणी होत्या. या आंदीचे आई-दादा (वडील) हे नेहमी शेतात राबताना दिसायचे. आंदीची आई ही नेहमी कामाला जुंपलेलीच असायची. असे हे आईवडील आणि धाकटा भाऊ असे तिचे कुटूंब होते. गुरढोरं राखणारी आंदी हळुहळू मोठी होऊ लागली आणि तिच्या आईवडीलांसमोर आंदीच्या लग्नाचा प्रश्न उभा राहिला. अठराविश्व दारिद्रय असले तरी वयात आलेल्या मुलीचे लग्न केले पाहिजे या विचारात ती दोघे असतात. त्यासाठी त्यांची धडपड चाललेली असते. शेवटी एका खाऊन-पिऊन सुखी असलेल्या कुटूंबातील एका कर्त्या मुलाबरोबर आंदीचं लग्न ठरतं. लग्न करताना आर्थिक विवंचनेमुळे आईवडीलांची होणारी परवड, त्यासाठी विकावी लागणारी गुरढोरं यामुळे आंदीच्या जीवाची कशापद्धतीने उलघाल होते याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत येते. आंदीच्या जीवनात येणाऱ्या या प्रसंगांना अनेक ग्रामीण मुलींना सामोरे जावे लागताना आपणास दिसून येते.

जीवाचा आटापीटा करून आईवडील आंदीचे लग्न करून देतात आणि त्यांचा जीव भांड्यात पडतो. पण लहानपण आईवडीलांच्या कुशीत गेलेल्या आंदीच्या जीवनाची खऱ्या अर्थाने शोकांतिका चालू होते. ती तिच्या लग्नानंतरच. लग्नानंतरचचे काही दिवस सुखात व आनंदात जातात. परंतु आंदी जेव्हा दोन मुलींची आई होते. तेव्हा मात्र मुलगा होत नाही

म्हणून आंदीच्या सासरच्याकडून आंदीची अवहेलना होते. नवराही नीट बोलत नाही. सासू-जाऊ घालूनपाडून बोलतात. हे सार सहन करत आंदी जगत असते. यातून आदींचा जीव गुदमरून जातो. शेवटी आंदी तिसऱ्यांदा गरोदर राहते. गरोदरपणात आंदीच्या मनाची होणारी उलघाल मनाला चटका लावणारी आहे. तिसऱ्यांदा मुलगी झाली तर सारे जीवनच संपेल असे तिला वाटते. पण तिच्या देवावरील श्रद्धेमुळे तीला मुलगा होतो. आणि आंदीच्या आईवडिलांचा जीवन भांड्यात पडतो. मुलगा झाल्याने नवराही गोड होतो. सासुही आनंदी होते. पण हा आनंद आणि नवऱ्याचे गोडपण आंदीच्या जीवनात फार काळ टिकणार नव्हते.

मुलगा झाल्यानंबर काही दिवसातच आंदीचा नवरा आजारी पडतो. त्याच्यावर अनेक उपचार केल जातात. पण काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे तो अधिकच अशक्त होतो. तो अंथरूणाला खिळतो. एवढा बलदंड गडी पूर्णपणे हताश होतो आणि आंदी पूर्णपणे कोलमडून पडते. अशा परिस्थितीत ती आपल्या लहान मुलांना घेऊन झगडत राहते. सासु-सासरे, जाऊ-दीर हे तिची साथ सोडतात. अशाही परिस्थितीत तिचा जीवनसंघर्ष चाललेला असतो. पण अवघ्या वर्षभरात नवऱ्याच दुखणं वाढत जात आणि त्यामध्ये त्याचा अंत होतो. आंदीवर आभाळ कोसळते. तरूण वयातच तिला वैधत्वाला सामोरे जावे लागते. सर्वस्व संपल असतानाही आई-वडील व भाऊ यांच्या आधारावरच आपल्या लहानशा मुलांकडे बघून ती पुन्हा एकदा जीवनात उभी राहते. राबराब राबून कष्ट करून ती आपल्या मुलांना सांभाळते. अशा वेळीही तिची कसोटी पाहणारे अनेक क्षण येतात. पण ती डगमगून जात नाही.

आंदी आपल्या मुलाबाळांना मोठी करते. मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने लावून देते. आणि एकुलत्या एका मुलग्याच्या आधारावर आपले जीवन जगत असते. आणि अशातच तिचा मुलगा आजारी पडतो. त्याच्या हातापायांना सूज येते. आंदीचा जीव घाबरून जातो. ती त्याच्यावर औषधोपचार करते पण काही फरक पडत नाही. तेव्हा तिच्या मुलाला डॉक्टर कोल्हापूरला मोठ्या डॉक्टरकडे तपासायला घेऊन जातात.' तिथे गेल्यानंतर अनेक तपासण्या केल्यानंतर आंदीला कळते की, त्याच्या वडीलांना जो रोग झाला होता तोच

पोरग्यालाही झालाय. आंदी पुन्हा एकदा संपूर्णपणे कोलमडून पडते. कधी नाही पण आज नवऱ्याचा राग करते आणि म्हणते, ''बिचारा जातानं 'बी' च्या 'बी' नी कीडच्या कीड ठेवून गेला.''[२३] संपूर्ण जीवनच आंदीला नकोनकोसे वाटते. पुन्हा एकदा तिला तिच्या बालपणाची आठवण येते. व तिचे मन आईच्या गावाकडील माळरानाकडे, गुराढोंराकडे, तांबुजाईकडे ओढ घेते. अशी ही ग्रामीण स्त्रीच्या जीवनाची शोकांतिका मांडणारी कृष्णात खोतांची 'गावठाण' ही कादंबरी.

तसे पाहिल्यास आंदीला जी दु:ख भोगायला आली आहेत. अशी दु:खे अनेक ग्रामीण स्त्रीच्या वाट्याला येतात. म्हणूनच एकंदरीत संपूर्ण ग्रामीण स्त्रिच्या दु:खाचे प्रातिनिधीक चित्रण करणारी 'गावठाण'ची नायिका आंदी ही आहे.

**निष्कर्ष :**

१) मराठी ग्रामीण वाङ्.मयात कथा, कवितेप्रमाणे कादंबरी हा ही साहित्यप्रकार यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येते.

२) वाङ्.मयीन क्षेत्रामध्ये एका विशिष्ट स्वरूपाच्या वाङ्.मय प्रकाराचा निर्देश करण्यासाठी कादंबरी ही संज्ञा मराठीत रूढ झाली आहे.

३) कृषिकेंद्रितता व त्याभोवती फिरणारा गावगाडा हाच ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू आहे.

४) 'पिराजी पाटील' ही धनुर्धारींची कादंबरी खऱ्या अर्थाने पहिली ग्रामीण कादंबरी ठरते.

५) ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहाला शंभर वर्षांची दीर्घ परंपरा आहे.

६) ग्रामीण आणि प्रादेशिक ह्या संकल्पना कादंबरीच्या बाबतीत चर्चीलेल्या आपणास दिसून येतात.

७) प्रादेशिक व ग्रामीण ह्या कादंबऱ्या आपआपल्या वैशिष्ट्यांसह अवतीर्ण होतात.

८) मराठी ग्रामीण कादंबरीही ग्रामीणतेतून साकारताना आपल्याला दिसून येते.

९) विशिष्ट अशा स्वरूपाचा रूपबंध ग्रामीण कादंबरीला लाभल्याचे आपणास दिसून येते.

१०) भौगोलिकता, सामुदायिकता, भाषाशैली, कृषिजीवन, संस्कृती, रूढी, परंपरा,

ग्रामजीवन, कुटूंबव्यवस्था ही ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये आढळतात.

११) स्थूलमानाने ग्रामीण कादंबरीच्या विकासाचे अनेक टप्पे केल्याचे दिसून येते.

१२) ग्रामीण कादंबरीला अनेक प्रतिभासंपन्न कादंबरीकारांनी उत्तरोत्तर अधिक वास्तव केल्याचे दिसून येते.

१३) 'गावठाण' मधून ग्रामीणत्त्वाचा अस्सल आविष्कार झाल्याचे आपणास दिसून येते.

१४) 'गावठाण' ही कादंबरी ग्रामीण 'स्त्री' च्या सुखदु:खाचे प्रतिनिधित्व करताना दिसून येते.

**सारांश :**

'मराठी ग्रामीण कादंबरी व गावठाण' या प्रकरणामध्ये प्रस्तुत प्रबंधलेखकाने सुरवातीला कादंबरी म्हणजे काय हे सांगून तिच्या महत्त्वाच्या घटकांची चर्चा केली. तद्नंतर मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतला. ग्रामीण कादंबरी म्हणजे काय हे सांगताना विविध समीक्षकांच्या मतांची नोंद घेतली. त्याचबरोबर मराठी ग्रामीण कादंबरीतील यशस्वी कादंबऱ्या व कादंबरीकार यांचा उहापोह केला. तद्नंतर मराठीतील 'पिराजी पाटील' ह्या पहिल्या ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतला. तद्नंतर एकूणच मराठी ग्रामीण कादंबरी विश्वाचा प्रवास कोणत्या दिशेने चालला आहे व त्याचे स्वरूप कसे आहे याची नेमकेपणाने चर्चा केली.

तद्नंतर कादंबरीमध्ये असणाऱ्या 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संकल्पनांचा उहापोह केला. आणि मराठीतील प्रादेशिक व ग्रामीण कादंबऱ्या कशा पद्धतीने लिहल्या गेल्या व त्यामधील यशस्वी साहित्यकृती कोणत्या यांची सर्वांगाने मीमांसा केली. तद्नंतर मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आपल्या अनेक वैशिष्ट्यांसह येणाऱ्या अस्सल ग्रामीणतेची चर्चा केली. त्याचबरोबर मराठी ग्रामीण कादंबरीचा रूपबंध नेमका कशा स्वरूपाचा आहे. याची चिकित्सा केली. तसेच मराठी ग्रामीण कादंबरीची असणारी भौगोलिकता,

सामुदायिकता, भाषाशैली, कृषिजीवन, संस्कृती, रूढीपरंपरा, ग्रामजीवन, कुटूंबव्यवस्था इ. वैशिष्ट्यांची सर्वांगाने चर्चा केली.

तद्नंतर मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवास पहात असताना १) निर्मिती ते १९५० २) १९५१ ते १९७० ३) १९७१ ते आजपर्यंत अशा विविध टप्प्यांवर सखोल चर्चा केली व या प्रत्येक टप्प्यामध्ये कादंबरी कशा पद्धतीने फुलून येते याचा आढावा घेतला. त्यानंतर एकूणच मराठी ग्रामीण कादंबरीला समांतर जाणाऱ्या व अस्सल ग्रामीणत्त्वाचा आविष्कार करून ग्रामीण स्त्रिच्या दु:खाची शोकांतिका प्रातिनिधीक स्वरूपात मांडणाऱ्या 'गावठाण' या कादंबरीची चिकित्सा केली. तद्नंतर निष्कर्ष नोंदवून सारांश सांगितला. हे सर्व करत असताना आवश्यक तेथे संदर्भाचा वापर करून त्यांची नोंद केली. अशाप्रकारे सदर प्रकरणाचा चोहोबाजंनी सर्वांगीण परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भसूची :

१) उषा हस्तक : 'कादंबरी' साहित्य अध्यापन आणि प्रकार, मौज प्रकाशन, पृ. २३२.

२) आनंद यादव : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-डिसें,१९८० पृ.२०.

३) आनंद यादव : तत्रैव, पृ,३२.

४) भालचंद्र नेमाडे : चर्चासत्राचे 'बीजभाषण', एस.एन.डी.टी.मुंबेई, जानेवारी २०००, पृ.२.

५) रवींद्र ठाकुर : मराठी ग्रामीण कादंबरी, पृ. १२.

६) अलोचना : मार्च १९७३, पृ. २४-२५.

७) डॉ. कुलकर्णी द.भि. 'तिसऱ्यांदा रणांगण', पृ.९२.

८) बोराडे रा. रं.: 'प्रतिष्ठान' नोव्हेंबर-डिसेंबर, १९९४, पृ. ४५,४६.

९) रा.शि.भावे : 'ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९८१, पृ.१

१०) आनंद यादव : 'ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९८१, पृ.१५.

११) आनंद यादव : 'ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पृ.८०.

१२) आनंद यादव : 'ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पृ.८१.

१३) आनंद यादव : 'ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पृ.८३.

१४) रवींद्र ठाकुर : 'मराठी ग्रामीण कादंबरी' पृ.२८.

१५) नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रामीण साहित्य शोध आणि बोध', पृ.१७.

१६) तत्रैव, पृ.११६.

१७) रा.ग.जाधव: नवसमीक्षा काही विचार प्रवाह, मेहता पब्लिकेशन, पृ.२०४.

१८) भालचंद्र नेमाडे, 'टीका स्वयंवर', पृ.१८८.

१९) गो. म. कुलकर्णी, 'साहित्य विचार व समीक्षा', पृ. ३९.

२०) कुसुमावती देशपांडे : 'मराठी ग्रामीण कादंबरीचे पहिले शतक', पृ.३००.

२१) ग्रामीण साहित्य – यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती १९९२, पृ.३२.

२२) प्रा.चंद्रकुमार नलगे (संपा.), 'ग्रामीण वाड्.मयाचा इतिहास', सुरेश एजन्सी, पुणे प्रथमावृत्ती १९९६, पृ.४६.

२३) कृष्णात खोत, 'गावठाण', मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५, पृ.१०६.